गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

* वर्ष ६५ वे * अंक ११८ * नांदेड * मंगळवार, दि. ५ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

पाचपैकी तीन राज्यात भाजपचा झेंडा; तामिळनाडू अभिनेता विजयकडे!

- केरळमध्ये काँग्रेसप्रणित आघाडीचा विजय
- पश्चिम बंगालमध्ये पहिल्यांदाच भाजपची सत्ता
- आसाममध्ये सलग तिसऱ्यांदा भाजपचा विजय
- पुद्दुचेरीतही भाजपचे कमळ फुलले

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. पश्चिम बंगाल, आसाम, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि केरळ या पाचही राज्यांमध्ये सोमवारी सकाळी आठ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. यामध्ये पश्चिम बंगालमध्ये भाजपला घवघवीत यश मिळाले. तर आसामध्येही भाजपने पुन्हा एकदा सत्ता राखण्यात यश मिळवले. तर केरळमध्ये डाव्यांचा शेवटचा गड पडला असून याठिकाणी काँग्रेसची सत्ता येण्याची शक्यता आहे. तर तामिळनाडूमध्ये विजय थलपति याच्या टीव्हीके पक्षाने मुसंडी मारत द्रमुक आणि अण्णाद्रमुकला मागे टाकले. तर पुद्दुचेरीमध्येही भाजपने यश मिळवले आहे.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीमध्ये राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल पाहायला मिळत आहे. अनेक वर्षे सत्तेत असलेल्या तृणमूल काँग्रेसला पराभूत करत भाजपने जोरदार मुसंडी मारली आहे. निवडणुकीच्या प्रचारापासून ते मतदानापर्यंत भाजपाने आखलेली रणनिती आणि मतदारांमध्ये झालेला बदल यामुळे ही लढत अधिक चुरशीची ठरली.

भाजपची अनेक वर्षांची रणनिती आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांसह अनेक नेते बंगालमध्ये तळ ठोकून होते. तसेच या विजयाचं मोठं श्रेय शुभेंदु अधिकारींनाही जातं. पक्षाचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांसारखे दिग्गज नेते सक्रिय होतेच. पण बंगालमध्ये प्रत्यक्ष जमिनीवर उतरून पक्षासाठी वातावरण तयार करण्यात शुभेंदु अधिकारी यांची भूमिका सर्वात महत्त्वाची ठरली. अंग-बंग आणि कलिंग अर्थात बिहार, बंगाल आणि ओडिशामध्ये वर्चस्व मिळवण्याचं भाजपचं जुनं स्वप्नही यानिमित्तानं पूर्ण झालं.

तामिळनाडूमध्ये अभिनेता विजयच्या तमिलगा वेत्री कळघम म्हणजेच टीव्हीके पक्षाची लाट विधानसभा निवडणुकीच्या निकालात पाहायला मिळाली आहे. या निवडणुकीच्या निकालात सत्ताधारी द्रमुकचा मोठा पराभव झाला आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांचा कोलाथूर विधानसभा मतदारसंघातून पराभव झाल्याची माहिती आहे.

देशातील डाव्या विचारांचा शेवटचा गड मानल्या जाणाऱ्या केरळमध्ये ऐतिहासिक सत्तांतर झाले आहे. केरळ विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील युनायटेड डेमोक्रेटिक फ्रंटने स्पष्ट बहुमत ओलांडले असून, डाव्यांच्या लेफ्ट डेमोक्रेटिक फ्रंटला मोठा धक्का बसला आहे. या निकालांमुळे केरळमध्ये दर पाच वर्षांनी सत्ता बदलण्याची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

आसाममध्ये भाजपची सत्ता आली आहे. विशेष म्हणजे आसाम विधानसभा निवडणुक २०२६ च्या निकालात आसामच्या जनतेने काँग्रेसला सफसेल नाकारलं आहे. आसामध्ये भाजपने १०० जागांवर मिळविला असून या ठिकाणी २० जागा ह्या काँग्रेसच्या पारड्यात पडल्या आहेत. आसाममध्ये भाजप एकहाती सत्ता आसाममध्ये मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांचा पुन्हा एकदा करिष्मा पाहायला मिळाला आहे.

यासह केरळमध्ये काँग्रेसने मित्रपक्षासोबत बाजी मारली असून बहुमतापेक्षा जास्त जागा त्यांनी मिळवल्या आहेत. पुदेचरीतही भाजपचे कमळ फुलल्याचे पहावयास मिळाले.

प. बंगाल विधानसभा

भाजप	२०७
तृणमूल काँग्रेस	८०
काँग्रेस	०२
डावे पक्ष	०२
इतर	०२
एकूण	२९४

तामिनळनाडू विधानसभा

द्रमुक	७४
अण्णाद्रमुक	५३
टीव्हीके	१०७
इतर	००
एकूण	२३४

आसाम विधानसभा

भाजप	१०२
काँग्रेस	१९
इतर	०५
एकूण	१२६

केरळ विधानसभा

काँग्रेस आघाडी	१०२
डावी आघाडी	३५
इतर	०३
एकूण	१४०

पुद्दचेरी विधानसभा

भाजप	१८
काँग्रेस	०६
इतर	०६
एकूण	३०

गड गेला अन् सिंहही गेला! ममता बॅनर्जी पराभूत

एकीकडे भाजपने पश्चिम बंगालमध्ये जोरदार मुसंडी मारत तृणमूल काँग्रेसचा गड उद्धवस्त केला. त्याचवेळी दुसरीकडे ममता बॅनर्जींनाही मोठा धक्का बसला आहे. ममता बॅनर्जी यांची सत्तेसोबत आमदारकीही गेली आहे. भवानीपूर मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांचा मोठा पराभव झाला आहे. भाजपच्या शुभेंदु अधिकारी यांनी ममता बॅनर्जी यांचा १५,१११ मतांनी पराभव केला. ममता बॅनर्जी यांचा पराभव झाल्यानंतर भाजपमध्ये आनंदाचं वातावरण आहे.

सर्व जनतेचे आभार –पंतप्रधान नरेंद्र मोदी

भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आज पुन्हा कमाल केली असून कमळ पुन्हा फुलले आहे. भाजपाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांचे मार्गदर्शनही कार्यकर्त्यांसाठी महत्त्वाचे ठरले. पाच राज्यांसह अनेक राज्यात पोटनिवडणूक झाली. त्यातही भाजपाच्या उमेदवारांना मतदारांनी भरभरून मतदान केले. महाराष्ट्रातील पोटनिवडणुकीतही एनडीएच्या नेत्या, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही मोठा विजय प्राप्त केला. त्यांचे समर्थन केल्याबद्दल मी राज्यातील सर्व जनतेचे आभार व्यक्त करतो. जय-पराजय हा लोकशाहीमधील अविभाज्य भाग असतो. पण यावेळी पाच राज्यातील जनतेने संपूर्ण विश्वाला दाखवून दिले की, आपला भारत लोकशाहीची जननी का आहे, असे मत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निकालानंतर व्यक्त केले.

आज संपूर्ण भारत जिंकला आहे –मुख्यमंत्री फडणवीस

बंगाल, आसाम, पद्दुचेरीतील हा विजय भारतीयांचा मोदींवर असलेल्या विश्वासाचा हा विजय आहे. आजही जनतेला एकच गोष्ट माहितीय, मोदी है तो मुमकीन है. बंगालमधून कुशासन बाहेर काढण्याचं काम ३० वर्षे काँग्रेस, ३६ वर्षे कम्युनिष्ट आणि या दोघांपेक्षाही खतरनाक १५ वर्षे ममता दीदीचं शासन होतं. बंगालची अवस्था या सर्व राज्यकर्त्यांनी कमी करुन ठेवली होती. ममतादीदी तुम्ही कितीही अत्याचार केला, तरीही भाजपच्या कार्यकर्त्यांना तुम्ही थांबवू शकणार नाही, असा हा आजचा विजय आहे. आज केवळ भाजप जिंकली नाही, तर संपूर्ण भारत जिंकला आहे, असे मत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

बारामतीत राष्ट्रवादी तर राहुरीत भाजपचा विजय

देशातील ५ राज्यांच्या विधानसभा आणि महाराष्ट्रातील दोन मतदारसंघात घेण्यात आलेल्या पोटनिवडणुकांचे निकाल सोमवारी लागले असून अपेक्षेप्रमाणे बारामती आण राहुरी मतदारसंघात महायुतीच्या दोन्ही उमेदवारांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला आहे. बारामतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तथा उपमुख्यमंत्री उमेदवार सुनेत्रा पवार यांनी मताधिक्याचा विक्रम नोंदवला आहे. सुनेत्रा पवार यांना २३ व्या फेरीअखेर तब्बल २ लाख १४ हजार ८५६ मतांची आघाडी होती. मात्र, शेवटच्या फेरीअखेर सुनेत्रा पवार २ लाख १८ हजार ९३० इतक्या विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्या आहेत. हे देशातील सर्वाधिक विधानसभा मताधिक्य असल्याचं सांगण्यात येत आहे. दुसरीकडे राहुरी विधानसभा मतदारसंघात भाजपच्या अक्षय कर्डिले यांनी देखील १ लाखांच्या मताधिक्याचा टप्पा पार केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावरील विश्वासाचे प्रतीक –खा. अशोक चव्हाण

पश्चिम बंगालमध्ये भाजपाने ऐतिहासिक विजय मिळवला असून, आसाममध्ये पुन्हा सलग तिसऱ्यांदा स्वबळावर सत्ता मिळवली आहे. पुदुच्चेरीमध्येही भाजपची आघाडी सलग दुसऱ्यांदा सरकार स्थापन करणार आहे. भाजपची सत्ता म्हणजे सुशासन आणि भाजपची सत्ता म्हणजे विकास, यावर देशाच्या कानाकोपऱ्यातील लोकांचा ठाम विश्वास असल्याचे या निकालातून सिद्ध झाले आहे. या विजयात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. नितीन नबीन, संबंधित राज्यातील भाजपचे नेते, उमेदवार आणि तमाम कार्यकर्त्यांच्या परिश्रमाचा मोठा वाटा आहे. पश्चिम बंगाल, आसाम आणि पुदुच्चेरीतील भाजपचा विजय हा देशाचे लोकप्रिय व खंबीर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावरील जनतेच्या विश्वासाचे प्रतीक असल्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे.

पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये भाजपला जनतेचा कौल– चैतन्यबापू देशमुख

पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये भारतीय जनता पक्षाला मिळालेला विजय हा केवळ निवडणुकीचा निकाल नाही, तर तो जनतेच्या विश्वासाचा, विकासाच्या राजकारणाचा आणि ठाम नेतृत्वाचा भव्य विजय आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारतीय जनता पार्टीच्या सर्व नेतृत्वाचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार व्यक्त केले. हा विजय दर्शवतो की, देशातील जनता आता खोट्या आश्वासनांना कंटाळली असून विकास, पारदर्शकता आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देणाऱ्या भाजपच्या विचारसरणीवर विश्वास ठेवत आहे. पश्चिम बंगालसारख्या राज्यात मिळालेला विजय हा परिवर्तनाची नांदी असून, आसाममधील यश हे विकासाच्या मार्गावर जनतेने दिलेला ठाम कौल असल्याचे प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख यांनी सांगितले.

महापालिकेचे विरोधी पक्षनेते म्हणून एमआयएमचे मसूद अहेमद खान यांची निवड; काँग्रेस-वंचित न्यायालयात जाणार

नांदेड (प्रतिनिधी)– येथील महानगरपालिकेच्या विरोधी पक्षनेतेपदी एआयएमआयएमचे मसूद अहेमद खान यांची निवड करण्यात आली आहे. महापालिकेत एमआयएमचे १४ नगरसेवक आहेत. दुसरीकडे काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्यावतीनेही विरोधी पक्षनेते पदावर दावा करण्यात आला होता, मात्र भारतीय जनता पक्षाच्या महापौर कविता मुळे यांनी एमआयएमचे मसूद अहेमद खान यांना विरोधी पक्षनेते म्हणून सोमवार, दि. ४ मे रोजी मान्यता दिली आहे. काँग्रेस- वंचित बहुजन आघाडीने महापौरांच्या या निर्णयाच्या विरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे.

नांदेड महापालिकेत सोमवारी घडलेल्या नाट्यमय घडामोडीनंतर तातडीने विरोधी पक्षनेतेपदावर एमआयएमचे मसूद अहेमद खान यांची निवड जाहीर करण्यात आली. महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, गटनेते ॲड. महेश कनकदंडे आणि स्थायी समितीचे सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले यांच्या हस्ते मसूद अहमद खान यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी भाजप तसेच एमआयएमच्या नगरसेवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. नांदेड महापालिकेत भारतीय जनता पक्षाचे एकूण ४५ नगरसेवक निवडून आले आहेत. त्याचवेळी शिवसेना शिंदे गटाच्या पाच नगरसेवकांनीही भाजपाला पाठिंबा दिला आहे. एमआयएम १४, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस १० आणि वंचित बहुजन आघाडी ५ तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन नगरसेवकांचा महापालिकेत समावेश आहे.

दरम्यान, या निवडीला काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीने विरोध दर्शविला आहे. काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीचे एकूण १५ नगरसेवक महापालिकेत निवडून आले आहेत. काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी ही निवडणुकीपूर्वी स्थापन करण्यात आली होती. त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून या आघाडीला मान्यता द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे. विभागीय आयुक्तांकडे एकत्रित नोंदणी असल्याने आमचाच्याच आघाडीचा विरोधी पक्षनेता व्हावा अशी मागणी करण्यात आली आहे. याच मागणीसाठी आता वंचित आणि काँग्रेस आघाडी न्यायालयातही धाव घेण्याच्या तयारीत आहेत.

भाजपच्या विजयाचा जल्लोष : 'झालमुडी' आणि मिठाई वाटप!

नांदेड– पश्चिम बंगाल, आसाम आणि पुदुच्चेरी विधानसभा निवडणुकीतील भाजपच्या विजयाबद्दल सोमवारी नांदेड शहरातील आयटीआय चौकात जल्लोष करण्यात आला. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, माजी आमदार तथा महानगराध्यक्ष अमरनाथ राजुरकर, महापौर कविता संतोष मुळे, दिलीप कंदकुर्ते, प्रवीण साले यांच्यासह कार्यकर्त्यांनी 'झालमुडी' आणि मिठाई वाटून आपला आनंद व्यक्त केला.



शिवाजीनगर ठाण्यातून आरोपींचे पलायन; पाठलाग करून एकाला पकडले, दोघेजण फरार

नांदेड (प्रतिनिधी)– न्यायालयीन प्रक्रियेसाठी जेलमधून प्रोडक्शन वॉरंटवर आणलेल्या तीन आरोपींपैकी दोघांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यातून पळ काढल्याची घटना समोर आली आहे.

संबंधित आरोपींना पुढील चौकशी व कारवाईसाठी पोलीस स्टेशनमध्ये आणण्यात आले होते. त्यांना दुसऱ्या मजल्यावरील डीबी (डिटेक्शन ब्रँच) रूममध्ये ठेवण्यात आले होते. यावेळी डीबी इन्चार्ज सय्यद व इतर कर्मचारी यांच्या देखरेखीखाली आरोपी होते. मात्र, संधी साधून तिघांनी अचानक खिडकीतून उड्या मारत पळ काढला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने परिसरात नाकाबंदी करून शोधमोहीम सुरू केली. पाठलाग करताना एका आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. मात्र दुसरे दोन आरोपी अजूनही फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

या प्रकारामुळे पोलीस ठाण्यातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. आरोपींनी इतक्या सहजतेने पळ काढल्याने निष्काळजीपणाचा मुद्दा पुढे येत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या घटनेची गंभीर दखल घेत चौकशीचे आदेश दिले आहेत. दरम्यान, फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली असून लवकरच त्याला अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलीस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

नांदेड– वाढत्या तापमानामुळे लोहा ते अहमदपूर जाणाऱ्या रस्त्यावर धावत्या कारने पेट घेतला. सुदैवाने यात कुठलीही जीवित हानी झाली नाही, मात्र आगीचे लोट व धूर पाहून या मार्गावरील वाहतूक काही काळ खोळंबली होती.

प. बंगालमध्ये मतमोजणीवेळी राडा; टीएमसीचे कार्यालयही पेटवले

कोलकाता (प्रतिनिधी) – पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीची मतमोजणी सुरू असताना राज्याच्या अनेक भागांत हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने ऐतिहासिक विजय मिळविला असून या विजयामुळे ममता बॅनर्जी यांच्या १५ वर्षांच्या सत्तेला सुरूंग लागला आहे.

मतमोजणी दरम्यान, राजकीय कार्यकर्त्यांमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर तृणमूल काँग्रेसचे एक पक्ष कार्यालय पेटवून देण्यात आले. आसनसोल आणि दिनहाटा येथील मतमोजणी केंद्रांवर संघर्षाच्या घटना घडल्याचे वृत्त आहे. आसनसोल इंजिनिअरिंग कॉलेज येथील मतमोजणी केंद्रावर, मतदान प्रतिनिधींमधील किरकोळ झटापटीचे एका मोठ्या संघर्षात रूपांतर झाले. आसनसोल-दुर्गापूर पोलीस आयुक्तालयाचे आयुक्त प्रणव कुमार यांच्या मते, काही समाजकंटकांनी एका राजकीय पक्षाच्या कार्यालयांना लक्ष्य केले असून, यामध्ये सहभागी असलेल्यांची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

भाजपाचे यश लक्षणीय

देशातील पाच राज्यांच्या विधानसभेच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर भारतीय राजकारणात नव्या समीकरणांची नांदी झाल्याचे स्पष्ट दिसून येते. आसाम, पुदुच्चेरी आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाला मिळालेले स्पष्ट बहुमत हे केवळ आकड्यांचे यश नसून, ते दीर्घकालीन नियोजन, संघटनशक्ती आणि मतदारांशी प्रस्थापित केलेल्या विश्वासाचे फलित आहे. तर उर्वरित राज्यांमध्ये मतदारांनी प्रस्थापित सत्ताधाऱ्यांवरच विश्वास दाखवून स्थैर्याला प्राधान्य दिले आहे. भाजपचे हे यश अनायासे मिळालेले नाही. मागील काही वर्षांत पक्षाने राष्ट्रीय पातळीवर तसेच राज्यनिहाय पातळीवर मजबूत संघटन उभारले आहे. कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग, बुथस्तरावरील नियोजन आणि निवडणूक व्यवस्थापनातील काटेकोरपणा या घटकांनी या विजयात मोलाची भूमिका बजावली आहे. विशेषतः ईशान्य भारतात, जिथे एकेकाळी भाजपची उपस्थिती अत्यल्प होती, तिथे आज पक्षाने मजबूत पाय रोवले आहेत. आसाममधील विजय याचेच उत्तम उदाहरण आहे. पश्चिम बंगालसारख्या राजकीयदृष्ट्या संवेदनशील आणि दीर्घकाळ एका विशिष्ट विचारसरणीच्या प्रभावाखाली राहिलेल्या राज्यात भाजपने मिळवलेले बहुमत हे बदलत्या जनमानसाचे द्योतक आहे. मतदारांनी केवळ विरोधासाठी विरोध न करता पर्याय म्हणून भाजपकडे पाहण्यास सुरुवात केली आहे. हे परिवर्तन केवळ राजकीय नाही, तर सामाजिक आणि मानसिक पातळीवरही घडत आहे. या यशामागे भाजपने स्वीकारलेली विकासाच्या राजकारणाची भूमिका महत्त्वाची ठरते. पायाभूत सुविधा, डिजिटलायझेशन, सामाजिक कल्याण योजना, आणि रोजगारनिर्मिती या मुद्द्यांवर केंद्रित केलेले राजकारण मतदारांना भावले आहे. पारंपरिक जातीय किंवा प्रादेशिक समीकरणांपलीकडे जाऊन, सर्वसमावेशक विकासाचा संदेश देण्यात पक्षाला यश आले आहे. सबका साथ, सबका विकास ही भूमिका केवळ घोषवाक्य न राहता प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न मतदारांना पटला आहे. पुदुच्चेरीसारख्या छोट्या राज्यात मिळालेले यशही तितकेच महत्त्वाचे आहे. येथे स्थानिक प्रश्न, प्रशासनातील पारदर्शकता आणि विकासकामांवरील भर यामुळे मतदारांनी भाजपला पसंती दिली आहे. यामुळे हे स्पष्ट होते की, केवळ मोठ्या राज्यांमध्येच नव्हे, तर लहान राज्यांमध्येही पक्षाची रणनीती प्रभावी ठरत आहे. दुसरीकडे, ज्या राज्यांमध्ये मतदारांनी विद्यमान सत्ताधाऱ्यांना पुन्हा संधी दिली आहे तेथे स्थैर्य आणि सातत्याला महत्त्व देण्यात आले आहे. हे लोकशाहीचेच सौंदर्य आहे की, मतदार आपल्या अनुभवावर आधारित निर्णय घेतात. विकासकामे, प्रशासनाची कार्यक्षमता आणि स्थानिक नेतृत्त्व यांचा परिणाम मतदानावर होत असल्याचे या निकालांतून स्पष्ट होते. या संपूर्ण प्रक्रियेत एक महत्त्वाची बाब लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे मतदारांची वाढती जागरूकता. आजचा मतदार अधिक सजग, माहितीपूर्ण आणि अपेक्षाभिमुख झाला आहे. केवळ भावनिक किंवा पारंपरिक मुद्द्यांवर तो निर्णय घेत नाही, तर प्रत्यक्ष कामगिरी आणि भविष्यातील आश्वासने यांचा विचार करून मतदान करतो. ही लोकशाहीसाठी सकारात्मक बाब आहे. भाजपच्या या यशाकडे केवळ राजकीय विजय म्हणून पाहणे अपुरे ठरेल. हे यश एका व्यापक दृष्टिकोनाचे प्रतीक आहे, ज्यामध्ये विकास, सुशासन आणि दीर्घकालीन नियोजन यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. मात्र, या विजयासोबत जबाबदारीही वाढते. जनतेने दिलेला कौल हा अपेक्षांचा द्योतक असतो, आणि त्या अपेक्षा पूर्ण करण्याचे आव्हान आता सत्ताधाऱ्यांसमोर आहे. या निवडणूक निकालांनी एक गोष्ट स्पष्ट केली आहे की भारतीय मतदार बदल स्वीकारण्यास तयार आहे, पण तो बदल विश्वासार्ह आणि विकासाभिमुख असावा लागतो. नियोजनबद्ध प्रयत्न, सकारात्मक राजकारण आणि जनतेशी जोडलेली भूमिका यांमुळेच कोणत्याही पक्षाला यश मिळू शकते. भाजपने हे सिद्ध केले आहे; आता त्या विश्वासाला न्याय देणे हीच खरी कसोटी ठरणार आहे.

ग्रंथालये ही ज्ञानाची दालने



प्रत्येक मुलांना पुस्तके वाचन करण्यास दररोज एक तरी तास मिळावा, त्यांच्या आवडीची पुस्तके मिळावीत, दर वर्षी प्रत्येक शाळा,महाविद्यालयाने ग्रंथाचे प्रदर्शन भरवावे, ग्रंथालयामार्फत अनेक ख्यातनाम व्यक्तीची व्याख्याने ठेवावीत. तसेच प्रकट मुलाखती घेऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे. आणि त्यांना बोलते करावे. ग्रंथालयामार्फत चर्चासत्रे घेऊन त्यात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवावा, त्यामुळे अनेक विद्यार्थी ग्रंथालयाकडे आपोआप वळतील. विद्यार्थ्यांनी ग्रंथाच्या प्रेमात पडावे. देश भक्ती पर ग्रंथ वाचन करावेत,ग्रंथालयातील पुस्तक वाचनाने मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वात प्रचंड बदल होतो. पुस्तके प्रेरणा देतात. ती खरी ज्ञानाची स्रोत आहेत. इलेक्ट्रॉनिक्स प्रसार माध्यमे, इंटरनेट व मोबाईलच्या अतिवापरामुळे वाचन कमी होत आहे. वाचन संस्कृतीचा ऱ्हास होत आहे. अशी भीती मनात अनेकांच्या उत्पन्न झाली आहे. आज ई-बुकची मुले वाचन करतात. हा दावा काही जण करतात परंतु ते सत्य नाही, पुस्तके ग्रंथालयात जो आनंद आहे. तो ई बुक मध्ये नाही अनेक महापुरुषाची चरित्रे पुस्तकातून आपणास वाचायला मिळतात त्यामुळे जगात अनेक क्रांत्या झाल्या आहेत. प्रत्येकाने ग्रंथालयातून पुस्तके आणून वाचन केल्यास आयुष्य बदलते. पुस्तक वाचल्यामुळे ब्रह्मानंद मिळतो तो इतर कशानेही मिळत नाही,

विद्यालयातील ग्रंथालयामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो.शाळा तिथे ग्रंथालय असावे.

ग्रंथालय तेथे ग्रंथपाल ही असणे तितकेच आवश्यक आहे. त्यांची नियुक्ती पूर्ण वेळ असावी. शासनाकडून ग्रंथालयाला जास्तीत जास्त प्रमाणात अनुदान मिळावे. त्यामुळे नवनवीन ग्रंथ खरेदी करता येईल. शालेय अभ्यासक्रमात ग्रंथालयाची भूमिका वाखाण्या जोगी असते. म्हणूनच ग्रंथाला गुरु असे म्हटले जाते.

ग्रंथ हेच गुरु असतात,हे लहानपणी विद्यालयात असते.

वेळी वाचले होते.ग्रंथा शिवाय जीवनाला अर्थ नाही, शाळेतील शिक्षण हे आयुष्यभर कोणालाही पुरत नाही. त्यासाठी त्याचा खरा मित्र कोणी असेल तर तो म्हणजे ग्रंथ होय. पुस्तकातून भावभावना, कल्पना, विचारसुमने ,सुविचार, सुभाषिते.अनुभव व ज्ञान जेव्हा अक्षरबद्ध केले जाते, तेव्हा त्याला ग्रंथ असे म्हणतात. प्राचीन काळापासून अनेक ग्रंथ आपल्याला मार्गदर्शन करत आहेत. कोणताही ग्रंथ असो, त्यामध्ये जास्तीत जास्त ज्ञानच मिळते. ग्रंथालयात ग्रंथ, ग्रंथपाल, आणि वाचक हे महत्त्वाचे तीन घटक आहेत. ग्रंथपाल हा वाचक आणि ग्रंथ यांच्यातला महत्त्वाचा दुवा समजला जातो. जेवढा ग्रंथपाल हुशार असेल तेवढा तो वाचकापर्यंत ग्रंथांची देव घेव करतो. विद्यार्थ्यांना प्रेरणा देतो. हसतमुखाने विद्यार्थ्यांचं स्वागत करतो. म्हणून चांगला ग्रंथपाल हा विद्यार्थ्यांना ग्रंथ प्रेमातून ग्रंथ भक्ती कडे घेऊन जाण्याचा प्रयत्न करतो. त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करतो. कथा, कादंबरी, नाटीका, काव्य वेगवेगळ्या मनोरंजन कथा, विज्ञान कथा भाकडकथाची पुस्तकं वाचकाला देतो. त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करतो. साहित्य संस्कृती मातृभाषा. देशप्रेम याविषयी असणारी पुस्तके वाचकांना तो पुरवतो म्हणून ग्रंथपाल ही नोकरी नसून ती एक विचारधारा व वृत्ती आहे. ग्रंथ आणि वाचक यांच्यात फरक पडला तर ग्रंथ हिरमुसले होतात. आणि वाचक उपाशी राहतात. असे एका ठिकाणी म्हटले आहे. म्हणून प्रत्येक ग्रंथपालने वाचकाच्या बुद्धीचा विकास होण्यासाठी नवनवीन पुस्तके आलेली वाचकापर्यंत विद्यार्थ्या पर्यंत पोहोचावी म्हणून ग्रंथालय ही ज्ञानाची सदावर्ते बनली पाहिजेत.

असे साहित्यसम्राट न. ची. केळकर म्हणतात. ग्रंथालयात वेगवेगळे दालनं असतात त्या दालना नुसार ग्रंथ पद्धतशीरपणे मांडणी करून ठेवले जातात.

नियतकालिके, वर्तमानपत्रे, नकाशे, चित्रे, ध्वनिमुद्रिका, दृकश्राव्य भींती असे कितीतरी वेगवेगळे प्रकार ग्रंथालयामध्ये दिसून येतात आणि पुस्तकाचे संदर्भ ग्रंथ मिळतात. मराठी, हिंदी,इंग्रजी, संस्कृत या भाषेचे शब्दकोश, चरित्रकोश, उत्पत्ती कोश आपल्याला भरपूर ज्ञान देतात. एका एका अक्षराची अनेक अर्थ सांगितले जातात. म्हणून ग्रंथपाल हा वाचक व ग्रंथालय यांच्यातला महत्त्वाचा दुवा आहे,तो एकमेकांना जोडतो. वर्तमानपत्रातून आपणास दररोज दैनंदिन घटना कला,क्रीडा, संगीत, विज्ञान, थोर पुरुषांची, क्रांतिकारकांची, समाज सुधारकांची, यशस्वी उद्योजकांची चरित्रे वाचन करण्यास मिळतात.

उद्योग, आरोग्य या विषयी भरभक्कम माहिती प्रकाशित करावयाचे असेल तर तुम्ही पुस्तकांशी दोस्ती करावी. महत्वाच्या लेखांची, वृत्ताची कात्रणे काढून विषयवार फाईल्स तयार केल्यास विद्यार्थ्यांच्या निरंतर उपयोगी पडतील.

व ग्रंथालयात एक नवीन दालन निर्माण होईल. कोणताही व्यक्ती एकाएकी घडत नाहीत. सुरुवातीच्या दहा वर्षे त्याचे बालपणातच निघून जातात. बालपणातून तो शाळेकडे येतो. ग्रंथालयात जातो आणि तिथून वेगवेगळ्या प्रकारचे ज्ञान घेऊन स्वतःच्या पायावर उभा राहतो. सामान्य ज्ञान,वाचन स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, परिसंवाद,चर्चासत्रे यासारखे अनेक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना यात सहभागी करून घेतले तर अतिशय चांगले होईल. त्यांच्यातील सुप्त गुणाचा विकास होईल. त्यांना वाचनाचा छंद लागेल. म्हणजे त्यांचे पैसे,शक्ती हे सर्व वाचेल हे स्पर्धेचे युग आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान असून उपयोगाची नाही तर अनेक क्षेत्रांमध्ये रोजगार संधी उपलब्ध आहेत. विविध क्षेत्रातील अभ्यासक्रम, तांत्रिक शिक्षण याची माहिती आता विविध नियत कालिकातून प्राप्त करता येते. १४५० मध्ये जर्मनीतील गटेनबर्ग येथे पहिला छापखाना सुरू झाला. आणि तेव्हापासून पुस्तके वाचण्यासाठी बाजारात येऊ लागली. खरेच पुस्तके नसती तर काय झालं असतं? हा विचार न केलेला बरा, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन नसल्यामुळे ते वाचन कमी करतात. त्यामुळे बाह्य जगाशी त्यांचा संबंध येत नाही. प्रत्येक शाळेवर शासनाने पूर्ण वेळ ग्रंथपाल द्यावा. ग्रंथपाल नसल्यामुळे ग्रंथालयात विद्यार्थ्यांना पुस्तक घेता-देता नाही येत.ग्रंथालयात ग्रंथपाल असल्यानंतर विद्यार्थ्यांचा ग्रंथालयाकडे जातो म्हणून विद्यार्थ्यांचे ग्रंथ प्रेम वाढवावे. प्रत्येक शाळेत ग्रंथालयाची अतिशय गरज आहे. नुसते ग्रंथालय असून चालणार नाही तर तिथे अनुभवी ग्रंथपाल असणे ही काळाची गरज आहे.

नवीन प्रकाशित झालेले पुस्तक ग्रंथालयात येणं गरजेचे आहे. जवळजवळ अनेक भाषांची पुस्तके ग्रंथालयात असावी.शालेय अभ्यासक्रमामध्ये ग्रंथालयाची भूमिका अतिशय महत्त्वाची मानली जाते. वाचाल तर वाचाल असे आपण म्हणतो. जिथे ज्ञान आहे तिथे मान आहे.

मान येण्यासाठी ज्ञानाची आवश्यकता आहे. ज्ञान येण्यासाठी ग्रंथालयाची आवश्यकता आहे. शाळा आणि ग्रंथालय यांचे अतूट नाते आहे ते कधीही तुटणार नाही म्हणून ग्रंथालयात पाक्षिकी, मासिके, वार्षिक अंक विविध महत्त्वाच्या लेखांची वृत्तांची कात्रणे काढून फाईल्स तयार कराव्यात. ग्रंथालयाद्वारे वाचन स्पर्धा, वकृत्व स्पर्धा परिसंवाद चर्चासत्रे यासारखे अनेक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना त्या सहभागी केले तर त्यांच्यातील सुप्त गुणाचा विकास होईल विकास होईल. व त्यांचे व्यक्तिमत्व आपोआप घडेल.एकदा वाचनाचा छंद लागला म्हणजे त्यांचा वेळ वाचतो. आज जगातील सर्व विचारवंत, समाजसुधारक, मोठमोठी व्यक्ती पुस्तक वाचूनच ज्ञानवंत, कीर्तीवंत, यशवंत झाले आहेत. यात तीळ मात्र शंका नाही. स्पर्धेचे युग असल्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देऊन जमणार नाही तर त्यांचे सर्व क्षेत्रा तील ज्ञान अद्यावत असणे आवश्यक आहे.

-प्रा. विठ्ठल बरसमवाड
अध्यक्ष : विठू माऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता. मुखेड, जि.नांदेड

आजचा सोशल जमाना आणि नाते संबंध

आजच्या सोशल जमान्यात नात्यात दुरावा वाढत चालला आहे. एकत्र कुटुंब पद्धती मागे पडत चालली आहे. जन्मदात्यांचा सांभाळ करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे. आजच्या पिढीने आई-वडिलांची सेवा केली पाहिजे. आई-वडील हीच आपली संपत्ती आहे.

प्रत्येक आई-वडील आपल्या मुलाबाळांसाठी रात्रंदिवस कष्ट करत असतात याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. नदीला जशी पाण्याची, शरीराला जशी आत्म्याची गरज असते. तसेच आई-वडील हे कुटुंबाचे भूषण आहे. हे लक्षात ठेवा. कोणतीच अपेक्षा न ठेवता आई-वडील आपल्या मुलाबाळांसाठी राबराबतात.तळहाताच्या फोडाप्रमाणे आपल्याला जपतात. लहानाचे मोठे करतात. यासाठी त्यांचे निस्वार्थ, निष्काम प्रेम व कोणतीही अपेक्षा न ठेवता काम करणारी व्यक्ती म्हणजे आई-वडील होय. आई-वडिलांच्या प्रेमापुढे जगातील साऱ्या गोष्टी शून्य आहेत. जगात सर्व काही विसरा, पण आई-वडिलांना विसरू नका.

आईच्या गर्भात ९ महिने आई आपल्याला प्राणपणाने जतन करते. या दुनियेत येताना आपले बोट धरून आयुष्याची मार्गक्रमणा करण्यास मार्गदर्शक ठरते. आई-वडिलांच्या प्रेमाने आपल्यात नवचैतन्य संचारते. आई-वडिलांनी मिठी मारताच सारे दुःख विसरायला होते. हे मात्र तितकेच खरे आहे. आपण नेहमी म्हणतो मातृदेव भव, पितृदेवभव खरोखर आई-वडिलांसारखे कोणतेही दैवत नाही. आई-वडील हे आपले दैवत आहे. आईची ममता धरणीमातेपेक्षाही महान आहे. या जगात कोण किती पुढे गेलेला पाहू शकत नाही. मात्र आई-वडील असे आहेत जे आपल्या मुलाला आपल्यापेक्षाही पुढे गेलेला पाहून आंनदी होतात. प्रत्येकाच्या जीवनात व्यक्तीमत्व घडविण्यात आपल्या आई-वडिलांच्या खारीचा वाटा आहे.दुबळा असो, वा अपंग असो आई-वडिलांना सारी मुले सारखीच असतात. या जगात आई-वडिलांएवढे प्रेम कोणी करू शकणार नाही. आई, वडिलांनी लावलेली माया ही आभाळाएवढी आहे. ही माया, त्यांनी केलेले प्रेम हे पैशाने कधीच विकत घेता येणार नाही.

जीवन जगत असताना आपल्यावर कुणाचे ना कुणाचे ऋण असतात. मात्र आई-वडिलांचे ऋण असे आहे की ते आपल्याला या जन्मात देखील चुकवता येणार नाही. आपल्या मुलाबाळांनी मोठे व्हावे, शिकून नाव कमवावे, आपल्याला त्यांचे सुख पाहता यावे.यासाठी सतत झिजत असतात.कारण त्यांची एकच इच्छा असते की आपला सारा जन्म मुलाबाळांच्या प्रपंचासाठी जावा.यासाठी मात्र ते कोणताही मोबदला घेत नाही. मात्र आज सभोवताली जर नजर टाकली तर आई वडीलांना वृद्धाश्रमात टाकण्याचे फॅड वाढले आहे.कौटुंबिक जिव्हाळा कमी होत चालला आहे, विभक्त कुटुंब पद्धतीमुळे आई वडील,आजीआजोबा क्वचित पहायला मिळतात. खरं म्हणजे वडील हे कुटुंबाचे प्रमुख आहेत. परंतु वृद्धाश्रमात आई-वडिलांना पाठवावे लागते ही शोकांतिका आहे. ज्या घरात आई-वडील आहेत तिथे काहीच कमी पडत नाही.

वृद्धाश्रम ही आपली संस्कृती नाही. कुटुबासारखं कोणतंच मोठं धन नाही. आई वडील हीच आपली संपत्ती आहे. ज्या घरात आहे वडील आहेत तिथे प्रेमभाव आहे.तिथेच ऐकोपा राहतो. कुटुब टिकून राहते.या जगात सर्व काही पैशाने मिळेल पण आई वडील मिळणार नाही.मोठ्या पुण्याईने आपल्याला आई वडील मिळतात. त्यांचे आशीर्वाद आपल्यासाठी लाख मोलाचे असतात. ज्यांचे आई-वडील हयात नाही. त्यांनाच आई वडीलांचे महत्व कळते.आज आपण आहोत ते आई वडिलांमुळेच हे लक्षात ठेवा. आपलं शिक्षण, प्रगतीसाठी त्यांनी अनेक खास्ता खाल्ल्या आहेत. ही दुनिया त्यांच्यामुळेच आपल्याला पहायला मिळाली. हे विसरु नका. त्यांचा आदर राखा, त्यांना मानसन्मान द्या. विवाहानंतर आई-वडिलांकडे दुर्लक्ष करता कामा नये. आई-वडिलांना नेहमी वाटते आपल्या मुलाबाळांचा संसार चांगला व्हावा.आपणही त्यांच्याशी प्रेमाने गोड बोलले पाहिजे.त्यांना आपल्याकडून दुसरी काही अपेक्षा नसते. आई-वडील ज्या घरात आहे तिथेच स्वर्ग आहे. इथेच पंढरी आहे. आई-वडिलांची सेवा करण्यासारखे दुसरे कोणतेही पुण्य नाही. जेव्हा बाळ रडतं तेव्हा सारख्या बिल्डिंगला समजते. परंतु जेव्हा आई-वडील रडतात ना तेव्हा शेजाऱ्यालाही थांगपत्ता लागत नाही. ही वास्तविकता आहे. आई-वडील वयाने नाही तर काळजीने म्हातारे होतात. हे सत्य आहे. आई-वडिलांजवळ बसा, त्यांची आदराने विचारपूस करा. त्यांच्यासठी प्रेमाचे दोन गोड शब्द बोला. आई-वडिलांचे आपल्यावर खूप मोठे उपकार आहेत हे विसरू नका. त्यांची सेवा करण्यासारखी दुसरी कोणतीही संधी नाही. म्हणूनच आई-वडील हे कुटुंबाचे भूषण आहे.हे विसरू नका.

-संतोष दत्तू शिंदे
मु. पो. काष्टी, ता. श्रीगोंदे,
जि. अहमदनगर
मो. ७७२१०४५८४५

वैभव सूर्यवंशी : भारतीय क्रिकेटचे भविष्य

आयपीएल म्हणजे रत्नांची खाण असे म्हंटले जाते कारण दरवर्षी आयपीएलमध्ये असे रत्न उदयास येते की ज्या रत्नाने संपूर्ण क्रिकेट विश्वच उजळून निघते. अशाच एका उगवत्या रत्नाने केवळ भारतीय क्रिकेटच नव्हे तर संपूर्ण क्रिकेट जगत उजळून निघाले आहे आणि हे क्रिकेट रत्न आहे अवघ्या १५ वर्षाचं आणि त्याचे नाव आहे वैभव सूर्यवंशी. सध्या आयपीएलमध्ये वैभव सूर्यवंशी या १५ वर्षाच्या मुलाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे अर्थात त्याने तसा कारनामाच करून दाखवला आहे. मूळचा बिहार राज्यातील असलेला वैभव सूर्यवंशी हा अवघ्या १५ वर्षाचा युवा खेळाडू आहे.

मागील वर्षी ज्यावेळी राजस्थान रॉयल्स संघाने त्याच्यावर १ कोटी १० लाखांची बोली लावून त्याला आपल्या संघात घेतले त्याचवेळी त्याची चर्चा सुरू झाली. राजस्थान रॉयल्स संघाने या १४ वर्षाच्या मुलावर इतकी मोठी बोली का लावली असा प्रश्न क्रिकेट वर्तुळात विचारला गेला त्याचे उत्तर शोधण्यासाठी थोडे मागे जावे लागेल. वैभव सूर्यवंशीने १२ व्या वर्षीच बिहारकडून १९ वर्षाखालील संघातून विणू माकड चषक क्रिकेट स्पर्धेत भाग घेतला तिथे त्याने चांगली कामगिरी केल्याने त्याची निवड बिहारच्या रणजी संघात करण्यात आली. बिहार कडून रणजी खेळणारा तो सर्वात कमी वयाचा खेळाडू ठरला. १३ व्या वर्षी वैभवने विजय हजारे चषकात धावांचा रतीब घातला त्यामुळे त्याची भारताच्या १९ वर्षाखालील ब संघात निवड झाली. ४ संघाने भाग घेतलेल्या या स्पर्धेत त्याने ६ डावात १७७ धावा काढल्या. त्यात त्याने दोन अर्धशतके झळकावली त्यामुळे ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारताच्या १९ वर्षाखालील मुख्य संघात त्याची निवड झाली.

१९ वर्षाखालील कसोटीतील पदार्पणाच्या सामन्यात त्याने अवघ्या ५८ चेंडूत तडाखेबंद शतक झळकावले त्यावेळी त्याचे वय १३ वर्ष होते. १९ वर्षाखालील आशिया कप स्पर्धेत तर त्याने धुमाकुळ घातला. तिथे यूएई विरुद्ध त्याने ४६ चेंडूत ७६ धावा काढल्या तर उपान्त्य फेरीत श्रीलंकेविरुद्ध ३६ चेंडूत ६७ धावा काढल्या. या स्पर्धेपासून त्याची सर्वत्र चर्चा होऊ लागली. ही चर्चा राजस्थान रॉयल्स संघाच्या पदाधिकाऱ्यांना समजली. त्यांनी त्यांचा बॅटिंग कोच असलेल्या विक्रम राठोडला वैभव सूर्यवंशीची फलंदाजी पाहण्यास सांगितले. विक्रम राठोड यांनी वैभव सूर्यवंशीची फलंदाजी पाहिली आणि त्याला आपल्या संघात घेण्याचे निश्चित केले. त्यांचा मुख्य कोच असलेला राहुल द्रविड हा तर नवोदित खेळाडूंना संधी देण्यास प्रसिद्ध आहे. त्याने देखील वैभवची फलंदाजी पाहिली आणि त्याला संधी देण्याचे ठरवले आणि अशाप्रकारे त्याची राजस्थान रॉयल्स संघात एन्ट्री झाली.

आयपीएल सुरू झाली, पण सुरुवातीच्या काही सामन्यात वैभवला संधी मिळाली नाही. लखनौ संघाविरुद्ध राजस्थान रॉयल्सने त्याला पहिल्यांदा संधी दिली. वैभव याच संधीची वाट पाहत होता. त्याने या संधीचे सोने करण्याचे ठरवले आणि त्याने पहिल्याच चेंडूवर शार्दुल ठाकूर सारख्या अनुभवी गोलंदाजाला पुढे सरसावत षटकार खेचला आणि सर्वांना चकित केले. या सामन्यात त्याने २० चेंडूत ३४ धावा काढून आपल्या आयपीएल कारकिर्दीची धडाकेबाज सुरुवात केली. दुसऱ्या सामन्यातही त्याने चांगली कामगिरी केली. गुजरात विरुद्धच्या सामन्यात तर त्याने कमाल करत अवघ्या ३८ चेंडूत १०१ धावा काढत क्रिकेट विश्वाला चकित केले. या शतकासोबत त्याने अनेक विक्रमाला गवसणी घातली. तो आयपीएल स्पर्धेत सर्वात कमी वयाचा शतकवीर ठरला. इतकेच नाही तर सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा भारतीय खेळाडू ठरला.

केवळ आयपीएलच नाही तर टी २० क्रिकेट इतिहासात सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा सर्वात कमी वयाचा खेळाडू ठरला. त्याने अवघ्या ३६ चेंडूत शतक झळकावत युसुफ पठाणचा विक्रम मोडला. एका सामन्यात सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रमही त्याने आपल्या नावे केला. मागील वर्षी आयपीएल गाजवलेल्या वैभवने यावर्षी तर कमाल करत अनेक विक्रम आपल्या नावे केले. यावर्षीही त्याने ३६ चेंडूत शतक झळकावत इतिहास घडवला. आयपीएलमध्ये दोन शतके आणि दोन्हीही ३६ चेंडूत झळकावणारा तो एकमेव खेळाडू ठरला. वयाच्या १५ वर्षी आयपीएलमध्ये दोन शतके झळकावणाराही तो एकमेव खेळाडू आहे. केवळ आयपीएलमध्येच नाही तर मागील वर्षी झालेल्या १९ वर्षाखालील टी २० स्पर्धेतही त्याने शानदार कामगिरी केली. त्यांच्या शानदार कामगिरीने भारताने तो विश्वचषक आपल्या नावावर केला होता. आयपीएल असो की राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रिकेट कोणत्याही स्पर्धेत तो जितक्या निर्भीडपणे खेळतो तितक्या निर्भीडपणे खेळणारे खूप कमी खेळाडू क्रिकेट विश्वात आहे. जसप्रीत बुमरा, ट्रेंट बोल्ट, रशीद खान, जोश हेजलवूड, मिचेल स्टार्क, पॅट कमिन्स यासारख्या जगातील दिग्गज गोलंदाजांना तो ज्या प्रकारे षटकार खेचतो ते पाहून अचंबित होते. अवघ्या १५ वर्षाच्या या खेळाडूच्या प्रेमात अवघे क्रिकेट विश्व पडले आहे. सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड, पॅट कमिन्स, डम गिलख्रिस्ट, वासिम अक्रम, सुनील गावसकर, श्रीकांत, अनिल कुंबळे, हरभजन सिंग, नवज्योत सिंग सिद्धू, हरभजन सिंग, महेंद्र सिंग धोनी यासारख्या महान खेळाडूंनी त्याचे कौतुक केले आहे.

क्रिकेटचा देव सचिन तेंडूलकर तर त्याच्या प्रेमातच पडला आहे. सचिन तेंडूलकरने वैभवच्या खेळाविषयी ट्विट केले की, वैभवची निडर शैली, उत्कृष्ट बॅट स्पीड, चेंडूची लांबी पटकन ओळखण्याची क्षमता आणि चेंडूच्या मागे ताकद लावण्याची तयारी या सर्वांचा संगम म्हणजे वैभवची धमाकेदार खेळी. केवळ सचिन तेंडुलकरच नव्हे तर जगातील अनेक दिग्गज खेळाडूंनी त्याच्या कौतुकाचे इमले बांधले आहेत. केवळ खेळाडूच नव्हे तर क्रिकेट प्रेमीनींही त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. क्रिकेट प्रेमींनी त्याच्या खेळीचे व्हिडिओ, फोटो सोशल मीडियावर पोस्ट करत त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. मिडिया तर त्याच्यावर फिदाच झाली आहे. त्याच्या खेळाने त्याने आपण भारतीय क्रिकेटचे भविष्य आहोत हे दाखवून दिले आहे. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे त्याने लहान वयातच आपण कोण होणार हे दाखवून दिले आहे. त्याच्या या लाजवाब फलंदाजीने त्याच्यावर प्रसिद्धीचा झोत आला आहे.

वैभवने मात्र या झगमगाटाकडे दुर्लक्ष करून खेळावर लक्ष केंद्रित करायला हवे. त्याला आणखी यशोशिखरे गाठायची असेल तर त्याने झगमगाटापासून दूर राहिलेलेच बरे. प्रसिद्धीच्या झगमगाटात वाहत जाऊन आपल्या करिअरचे मातेरे करणारे अनेक खेळाडू आपण पाहिले आहेत. विनोद कांबळी, पृथ्वी शॉ ही त्याची बोलकी उदाहरणे आहेत. वैभवने आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करून आणखी मेहनत केल्यास तो भारतीय क्रिकेटचे भविष्य ठरेल यात शंका नाही. वैभवला खूप खूप शुभेच्छा!

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करा; आपत्ती टाळण्यासाठी सज्ज राहा -जिल्हाधिकारी कर्डिले

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात संभाव्य पावसाळी आपत्ती टाळण्यासाठी सर्व विभागांनी मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करावीत आणि आपत्ती व्यवस्थापनाचे आराखडे तत्काळ सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन येथे आयोजित मान्सूनपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कुन्हे, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, यावर्षी पावसाचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी उष्णतेमुळे अचानक मुसळधार पावसाची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पूरपरिस्थिती उद्भवू नये यासाठी प्रशासनाने सज्ज राहणे गरजेचे आहे.

विष्णुपुरी धरणात सध्या पिण्याच्या पाण्याचा पुरेसा साठा असून, त्याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच धरणाचे गेट, नवीन पाईपलाईन कामे यांची स्थिती तपासण्याचे निर्देश देण्यात आले. मागील वर्षी मुखेड, नायगाव, बिलोली, कंधार यांसह विविध तालुक्यांमध्ये पूरस्थिती निर्माण होऊन अनेक गावांचा संपर्क तुटला होता. यंदा अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी ठोस उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शहरातील नाल्यांची स्वच्छता करून सखल भागात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच पूल आणि रस्त्यांवरून पाणी वाहून जाऊन नागरिक अडकणार नाहीत यासाठी नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

आरोग्य विभागाला ग्रामीण भागात औषधसाठा मुबलक ठेवण्याचे, तसेच सर्पदंशावरील औषधे सर्व आरोग्य केंद्रात उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. पशुसंवर्धन विभागाने नदीपात्रात पशुधन बांधू नये यासाठी जनजागृती करावी, असेही सांगण्यात आले.

बैठकीच्या शेवटी, सर्व विभागांनी तालुका पातळीवरील कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करून आपत्ती व्यवस्थापनाचे आराखडे तत्काळ जिल्हा प्रशासनाकडे सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिले.

जिल्हाधिकारी यांनी सर्व उपविभागीय अधिकारी यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. यावर उपाययोजना करण्याबाबत मार्गदर्शन केले व सर्व विभागांनी समन्वय ठेवून कामे पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

विकास गंगा प्रतिष्ठान संस्था ताब्यात घेण्यासाठी बनावट कागदपत्रांआधारे फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल

नांदेड (प्रतिनिधी) – मुखेड तालुक्यातील शिकारा येथील विकास गंगा प्रतिष्ठान या संस्थेचे संस्थापक सिद्धार्थ जाधव यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या विधवा पत्नीला विश्वासात घेऊन परस्पर बनावट कागदपत्रे निर्माण करून सदर संस्था ताब्यात घेण्यासाठी फसवणूक केल्याप्रकरणी माधवी सिद्धार्थ जाधव त्यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुखेड तालुक्यातील शिकारा येथे विकास गंगा प्रतिष्ठान या संस्थेची स्थापना सिद्धार्थ जाधव यांनी २००० मध्ये केली होती. त्यांच्या पत्नी अध्यक्ष तर ते स्वतः सचिव म्हणून कार्यरत असताना त्यांनी संस्थेअंतर्गत पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादक पदविका हा दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. याच संस्थेअंतर्गत शिकारा येथे नवबौद्ध व अनुसूचित जाती-जमाती विद्यार्थ्यांसाठी निवासी आश्रम शाळेचा २००४ साली सादर केलेला प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी विचाराधीन आहे.

संस्थाचालक सिद्धार्थ जाधव यांचे ९ जून २०२४ रोजी मुखेड येथे अपघाती निधन झाले. सदर संस्था ताब्यात घेण्याच्या उद्देशाने त्यांची विधवा पत्नी माधवी यांचे नातेवाईक संतोष गायकवाड, शंकर गच्चे व गौतम सावंत यांनी मीनाक्षी शेषराव लोकडे व संतोष शंकर गायकवाड यांच्यासह गीताबाई नामदेव सावंत यांची संस्थेमध्ये नवीन नियुक्ती केली व माधवी सिद्धार्थ जाधव यांचा विश्वासघात केला असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या फसवणुकीप्रकरणी माधवी जाधव यांच्या फिर्यादीवरून संतोष शंकर गायकवाड व मीनाक्षी शेषराव लोकडे यांच्या विरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गु.र.नं -१२२/२०२६ अन्वये विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रेल्वे गाड्यांमध्ये विस्तार करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय

नांदेड (प्रतिनिधी)– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत प्रवाशांच्या सोयीसाठी विविध विशेष गाड्यांना नियमित करून नवीन गाड्यांची सुरूवात तसेच विद्यमान गाड्यांमध्ये विस्तार करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. रेल्वे बोर्डाच्या मान्यतेनुसार खालीलप्रमाणे बदल करण्यात आले आहेत.

नांदेड - तिरुचानूर-नांदेड साप्ताहिक एक्सप्रेस (१७६३३/१७६३४) नियमित सुरु : प्रवाशांच्या वाढत्या मागणीचा विचार करून पूर्वी चालविण्यात येत असलेल्या स्पेशल गाडीचे (०७०१५/०७०१६) नियमितीकरण करून ती आता नांदेड-तिरुचानूर-नांदेड दरम्यान नवीन साप्ताहिक एक्सप्रेस सुरू करण्यात येत आहे.

गाडी क्र. १७६३३ (नांदेड तिरुचानूर) : दर शनिवारी, प्रारंभ दि. ९ मे २०२६, प्रस्थान १६:४५ वाजता गाडी क्र. १७६३४ (तिरुचानूर नांदेड) : दर रवि, प्रारंभ दि. १० मे २०२६, प्रस्थान १९:४५ वाजता ही गाडी नांदेड, मुदखेड, निजामाबाद, वारंगल, विजयवाडा, नेल्लोर, रेनीगुंटा आदी महत्त्वाच्या स्थानकांमार्गे धावणार आहे.

जालना - तिरुचानूर-जालना साप्ताहिक एक्सप्रेस (१७६३७/१७६३८) नियमित सुरू : प्रवाशांच्या वाढत्या मागणीचा विचार करून पूर्वी चालविण्यात येत असलेल्या स्पेशल गाडीचे (०७६०९/०७६१०) नियमितीकरण करून ती आता जालना - तिरुचानूर - जालना दरम्यान नवीन साप्ताहिक एक्सप्रेस सुरू करण्यात येत आहे.

गाडी क्र. १७६३७ (जालना तिरुचानूर) : दर सोमवारी, प्रारंभ दि. ११ मे २०२६, प्रस्थान ७ वाजता गाडी क्र. १७६३८ (तिरुचानूर - जालना) : दर मंगळवारी, प्रारंभ दि. १२ मे २०२६, प्रस्थान १५:१५ वाजता ही गाडी परभणी, लातूर रोड, विकाराबाद, गुंटूर, रेनीगुंटा आदी स्थानकांमार्गे धावणार आहे.

पूर्णा-जालना-नांदेड डेमू पॅसेंजर (७७६२३/७७६२४) नियमित सुरु : प्रवाशांच्या वाढत्या मागणीचा विचार करून पूर्वी चालविण्यात येत असलेल्या स्पेशल गाडीचे (०७२८१/०७२८२) नियमितीकरण करून ती आता दैनंदिन पूर्णा - जालना - नांदेड डेमू पॅसेंजर सेवेत रुपांतरित करण्यात आली आहे.

गाडी क्र. ७७६२३ (पूर्णा जालना) : दररोज, प्रारंभ दिनांक ४ मे २०२६, प्रस्थान २१:०० वाजता गाडी क्र. ७७६२४ (जालना-नांदेड) : दररोज, प्रारंभ दि. ५ मे २०२६, प्रस्थान २३:०० वाजता.

ही डेमू गाडी परभणी, सेलू, परतूर मार्गे धावणार असून, स्थानिक प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे.

नांदेड - रायचूर -परभणी एक्सप्रेस (१७६६३/१७६६४) जालना पर्यंत विस्तारीत : प्रवाशांच्या वाढत्या मागणीचा विचार करून विद्यमान नांदेड -रायचूर - परभणी एक्सप्रेसचा जालनापर्यंत विस्तार करण्यात आला आहे.

गाडी क्र. १७६६३ (रायचूर जालना) : दररोज, विस्तार लागू दि. ५ मे २०२६, प्रस्थान १५:५० वाजता.

गाडी क्र. १७६६४ (जालना रायचूर) : दररोज, विस्तार लागू दि. ६ मे २०२६, प्रस्थान १७:३० वाजता. या विस्तारामुळे परभणी, सेलू, परतूर मार्गावरील प्रवाशांना थेट रेल्वे सुविधा उपलब्ध होणार आहे. या बदलामुळे गाडी क्र. ५७६५९ परभणी नांदेड पॅसेंजर रद्द करण्यात आली आहे.

रामतीर्थ येथे आज बुद्ध मूर्ती स्थापना सोहळा

रामतीर्थ (प्रतिनिधी)– बिलोली येथे उभारण्यात आलेल्या तक्षशीला बुद्ध विहारात ५ मे रोजी गौतम बुद्धांच्या मूर्तीची स्थापना सोहळा आयोजित करण्यात आला आहे९

माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पारपडणार असून, खासदार रवींद्र पाटील चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून, तर आमदार जितेश अंतापूरकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता पंचशील ध्वजारोहणाने होणार असून, त्यानंतर सकाळी ९ वाजता बुद्ध मूर्तीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. साडेदहा वाजता विहारात मूर्ती स्थापना व धम्मदेशना होणार आहे. सायंकाळी ८ वाजता सुप्रसिद्ध शाहीर डॉ. अनिरुद्ध वनकर यांचा शिवराय ते भीमरायांचा वादळ वारा हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

मिलन वेल्फेअर सोसायटीचा सामूहिक विवाह सोहळा उत्साहात संपन्न

नांदेड (प्रतिनिधी)– येथील मिलन वेल्फेअर सोसायटीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही रविवार, दि. ३ मे रोजी सकाळी १० वाजता नूरी चौक येथील बी. के. फंक्शन हॉलमध्ये २४ वा सामूहिक विवाह सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात १५ जोडपे विवाहबद्ध झाली आहेत.

या प्रसंगी निकाह व इजाब-ओ-कबूलची कार्यवाही हाफिज व काजी मोहम्मद रफीक यांनी पूर्ण केली. निकाहपूर्वी मुफ्ती सय्यद शफीउद्दीन कासमी आणि मौलाना साद अब्दुल्ला यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना निकाहचे धार्मिक महत्त्व, पती-पत्नीचे अधिकार व कर्तव्ये तसेच विवाह सोहळे सुलभ करण्याची गरज यावर सविस्तर भाष्य केले. तसेच मिलन वेल्फेअर सोसायटीच्यावतीने गेल्या २४ वर्षांपासून सुरू असलेल्या सामाजिक कार्याचे कौतुक करून पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

खुतबा-ए-निकाह मौलाना तैयब यांनी वाचून दाखवला, तर कार्यक्रमाची सांगता मौलाना साद अब्दुल्ला यांच्या आशीर्वादाने झाली. या सामूहिक विवाह सोहळ्यात नवदांपत्यांसह त्यांच्या नातेवाईक व पाहुण्यांसाठी भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित राहून नवविवाहित जोडप्यांना तसेच सोसायटीच्या सदस्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी मिलन वेल्फेअर सोसायटीतर्फे नवदांपत्यांना जीवनावश्यक वस्तू जसे की पलंग, गादी, कपाट, कुलर व इतर साहित्य भेट देण्यात आले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सोसायटीचे अध्यक्ष हाजी बाबू खान सत्तार खान, हाजी महमूद खान, मोहम्मद सफदर, हाजी मोहसिन चावूस, मोहम्मद याकूब, हाजी मोहम्मद अमीन, शेख सलीम, सय्यद इमरान, शेख अहमद, हाजी सय्यद कय्यूम अली, हाजी गौस मोहिउद्दीन, शेख जलील, शेख मुबीन, अब्दुल मुकीत, मोहम्मद अब्दुल रशीद, शेख अहमद चावूस, फिरोजभाई, शेख नदीम, शेर खान, अयूब खान, शेख शकील, बशारत खान तसेच सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

गोदावरी मनार ज्युनिअर कॉलेजच्या निकालाची परंपरा यंदाही कायम

शंकरनगर (प्रतिनिधी) –येथील इंग्रजी माध्यमाच्या गोदावरी मनार पब्लिक स्कूल अंतर्गत चालणाऱ्या नामांकित निवासी ज्युनिअर कॉलेजच्या विज्ञान शाखेचा निकाल सलग अकराव्या वर्षीही शंभर टक्के लागला आहे. संस्थेने आपल्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी शिक्षण मिळावे या उद्देशाने माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी शंकरनगर (ता. बिलोली, जि. नांदेड) येथे या संस्थेची स्थापना केली. गेल्या तेवीस वर्षांपासून दहावीच्या निकालात शंभर टक्के यश मिळवत असताना, यावर्षी बारावी विज्ञान शाखेतही शंभर टक्के निकालाची परंपरा संस्थेने यशस्वीपणे जोपासली आहे.

बारावीच्या परीक्षेस एकूण ८५ विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती. त्यापैकी सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तसेच विविध प्रकल्पांतर्गत ६७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून, तेही सर्व उत्तीर्ण झाले आहेत.

यामध्ये कोमल भाऊराव मुकाडे (७८.३३%) हिने प्रथम क्रमांक मिळवला, तर धनवे उत्कर्षा देविदास (७४.५०%) द्वितीय व सीडाम संध्या शामराव (६९.५०%) हिने तृतीय क्रमांक पटकावला.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, सचिव डॉ. मीनलताई निरंजन पाटील खतगावकर तसेच प्राचार्य डी. पी. पांडेय यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शंकरनगर येथील श्री साईबाबा माध्यमिक विद्यालयातील विज्ञान शाखेचा ९९ टक्के निकाल

शंकरनगर (प्रतिनिधी)– कॉपीमुक्त अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेत शंकरनगर येथील श्री साईबाबा माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत ९९% टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. या यशामुळे विद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता अधोरेखित झाली असून, परिसरात समाधान व्यक्त होत आहे.

विज्ञान शाखेमध्ये एकूण १६८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी १६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष श्रेणीमध्ये सहा, प्रथम श्रेणीत उत्तीण झाले. शाळेचा निकाल ९९ टक्के लागला असून, प्रथममध्ये प्रेरणा मधुकर देशमुख ८५%, द्वितीय आमोद दीपक सारपे ८३ टक्के, संस्कृती जीवनराज शिंदे ८१ टक्के, कला शाखेमध्ये ३८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. ३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. १९.८०% कला व वाणिज्य शाखेचा निकाल लागला आहे. कला शाखेतून प्रथम रंजनी देत राहते ५३%, द्वितीय संदेश रावसाहेब हिवराळे ५३, तृतीय लक्ष्मण तुळशीराम पेंट ५० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.

इयत्ता १२ वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, सचिव डॉ. सौ. मीनलताई निरंजन पाटील खतगावकर, प्राचार्य धनंजय शेळके यांनी अभिनंदन केले आहे.

नागेश कंकाळ यांना उत्कृष्ट सेवा पदक पुरस्कार जाहीर

नांदेड (प्रतिनिधी)– येथील वसंतनगर भागातील रहिवासी नागेश देवराव कंकाळ यांना राज्याच्या पोलीस

महासंचालकांच्या वतीने देण्यात येणारा उत्कृष्ट सेवा पदक पुरस्कार जाहीर झाला आहे. शुक्रवार, दि. १ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त होणाऱ्या ध्वजवंदनानंतर पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते नागेश कंकाळ यांचा गौरव करण्यात येणार आहे.

कंकाळ यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांना आतापर्यंत ९ प्रशस्ती पत्रांसह १६० वेळा पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

महात्मा गांधी विद्यालयाच्या यशाची उज्ज्वल परंपरा कायम

मुदखेड (प्रतिनिधी)– गांधी शिक्षण संस्था संचालित महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये झालेल्या बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. याही वर्षी उच्च माध्यमिक विद्यालयाने यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली असून, विद्यालयाचा निकाल विशेष उल्लेखनीय लागला आहे.

महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण २३० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी परीक्षा दिली होती. त्यामध्ये कला शाखेचे १५२ पैकी १२८ पास झाले असून, ८४ टक्के एवढा निकाल लागेला आहे. कला शाखेमध्ये प्रतिभा मारुती ढगे हिने ८४ टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळवला आहे तर द्वितीय मोहिनी चक्रधर शिंदे हिने ८० टक्के गुण प्राप्त केले आहेत.

विज्ञान शाखेमध्ये ७६ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी परीक्षा दिली होती. त्यामध्ये ७२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कनिष्ठ महाविद्यालयाचा एकूण निकाल ९४% लागला आहे. या परीक्षेत समीक्षा अप्पाराव गाढे हिने ६६ टक्के गुण संपादन करून सर्वप्रथम आली आहे तर द्वितीय श्रुती मानेजी हिने यश संपादन केले आहे. या यशाबद्दल महात्मा गांधी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राम चौधरी, उपाध्यक्ष रामप्रसाद सोनी, सचिव लक्ष्मणराव सोनटक्के, कोषाध्यक्ष शंकरराव पचलिंग, प्राचार्य बाबुराव नाईक, प्राचार्य अभया लोहगावकर, उपमुख्याध्यापक तथा संचालक किरण देशपांडे, प्रा. अमृत जाधव, प्रा. ज्ञानेश्वर गरुडकर, प्रा. सूर्यकांत गोंड, प्रा. सारंग, प्रा. कौशल्य, प्रा. गिरी बालाजी, प्रा. दिनेश शेटे, प्रा. मंगनाळे, प्रा. अनलदास त्र्यंबक, प्रा. कदम, प्रा. मोरे, प्रा. सूर्यवंशी, प्रा. सोनकांबळे यांच्यासह रघुनाथ मिटके, चंद्रकांत वाघमारे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून महाडीबीटी व्हर्जन २.०० कार्यान्वित

नांदेड (प्रतिनिधी)– राज्य शासनाच्या सुधारित धोरणानुसार महाडीबीटी प्रणालीचे व्हर्जन २.०० हे आगामी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून कार्यान्वित करण्यात येणार आहे. नवीन प्रणालीमध्ये डेटा हस्तांतरण आणि तांत्रिक सुसूत्रता राखण्यासाठी जुन्या प्रणालीवरील प्रलंबित अर्ज निकाली काढणे अनिवार्य आहे.

सद्यस्थितीत महाडीबीटी पोर्टलवरील सर्व योजनांचे अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन २०१९-२० ते २०२५-२६ या कालावधीतील भरपूर प्रमाणात अर्ज महाविद्यालय व विद्यार्थी स्तरावर प्रलंबित असल्याचे दिसून येते. सर्व महाविद्यालयांनी ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटी पूर्ततेअभावी प्रलंबित आहेत, अशा विद्यार्थ्यांना संपर्क करून त्रुटीची पूर्तता करून घ्यावी. सदरील पात्र अर्ज तत्काळ या कार्यालयाचे स्तरावर पाठविण्यात यावेत. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटी पूर्तता होत नसतील व जे अर्ज अपात्र आहेत असे अर्ज आपल्या स्तरावरून रिजेक्ट करण्यात यावेत.

नांदेड जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी आपल्या स्तरावरील सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षातील प्रलंबित अर्ज मंगळवार ५ मे २०२६ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत निकाली काढावेत, असे कळविण्यात आले आहे.

डॉ. बाबासाहेबांची प्रतिमा आमच्या समाजाचे अस्तित्व -सुरेश गायकवाड

नांदेड (प्रतिनिधी) –आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा लावून दरवर्षी जयंती मोठ्या हर्षोल्हासात साजरी करतो. ही डॉ. बाबासाहेबांची प्रतिमा म्हणजेच आमची प्रेरणा आहे. ही एक आमची ऊर्जा आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांची जयंती मोठ्या उत्साहात जगभर साजरी होते आणि ती साजरी झालीच पाहिजे, असे प्रतिपादन आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते सुरेश गायकवाड यांनी केले. शहरातील भैय्यासाहेब आंबेडकरनगर येथील प्रज्ञा-करुणा विहाराच्या प्रांगणात नगरसेवक प्रतिनिधी रमेश गोडबोले मित्र मंडळाच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती आणि तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५७० व्या जयंतीनिमित्त बुद्ध- भिम गीतांच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते.

यावेळी विचार मंचावर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, सुखदेव चिखलीकर, काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. दिनेश निखाते, माजी नगरसेवक प्रतिनिधी सुरेश हाटकर, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत भुसेवाड, नगरसेविका ज्योत्सना राजू गोडबोले, नगरसेवक प्रतिनिधी अब्दुल फईम, अब्दुल मुनीर, नगरसेवक सय्यद शोएब मजर हुसेन, नगरसेवक मोहसीन खान आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना सुरेश गायकवाड म्हणाले की, बाबासाहेबांच्या जीवनाची सुरुवात वर्गाच्या बाहेर राहून झाली. त्याच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कार्याने तुमचं आमचं जीवन आसमंताप्रमाणे उजळून निघालं. आज खऱ्या अर्थाने जयंती आपण साजरी करतो.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भगवान येवले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नगरसेवक प्रतिनिधी रमेश गोडबोले मित्र मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला शहरातील बौद्ध उपासक- उपासिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

युवकांनी डॉ. बाबासाहेबांच्या विचारानुसार जीवन जगावे –पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार

डॉ. बाबासाहेबांनी जो मार्ग दाखवलेला आहे तो म्हणजे अभ्यास करण्याचा. समाजासाठी काहीतरी सकारात्मक काम करण्याचा. त्यामध्ये सर्व युवकांनी सहभागी झाले पाहिजे. गुन्हेगारीचे जे चक्र आहे, त्यामध्ये आपण न जाता भाईगिरी, दादागिरीमध्ये छोटे-मोठे भांडण करून पोलीस स्टेशनच्या फेऱ्या मारण्यात तसेच कोर्ट-कचेरीमध्ये खूप वेळ आणि पैसा जातो. यासाठी प्रत्येक युवकांनी तिकडे न जाता डॉ. बाबासाहेबांच्या विचारांनुसार वागून चांगले जीवन जगावे. या परिसरातील मुलांना काहीतरी चांगले मार्गदर्शन करण्यासाठी मी येथे आलो. तसेच आपल्या सोबत पोलीस प्रशासन सदैव तत्पर असल्याचे अबिनाश कुमार म्हणाले.

यमुनाबाई माध्यमिक व ज्युनियर कॉलेजचा बारावीचा उत्तम निकाल; २९ वर्षांची यशाची परंपरा कायम

नायगाव बाजार (प्रतिनिधी) –नायगाव येथील यमुनाबाई माध्यमिक व ज्युनियर कॉलेजने बारावीच्या निकालात यंदाही उज्ज्वल कामगिरी करीत सलग २९ वर्षांची यशस्वी परंपरा कायम राखली आहे. विशेष म्हणजे विज्ञान शाखेचा १०० टक्के निकाल लागला. संस्थेने शैक्षणिक गुणवत्तेचा उच्चांक कायम ठेवला आहे, तर कला शाखेनेही ९१.४२ टक्के निकालासह उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विज्ञान शाखेत एकूण ६८ विद्यार्थिनी परीक्षेस बसल्या होत्या. त्यापैकी सर्वच्या सर्व ६८ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून, ८ विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत तर ५२ विद्यार्थिनी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत. हा १०० टक्के निकाल संस्थेच्या सातत्यपूर्ण गुणवत्तेचे द्योतक ठरले आहे.

कला शाखेत एकूण ३५ विद्यार्थिनींपैकी ३२ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून, ७ विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत, तर १९ विद्यार्थिनी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत. कला शाखेचा निकाल ९१.४२ टक्के लागला आहे.

विज्ञान शाखेत कु. निकिता पांढरे (७०.८३%) हिने प्रथम क्रमांक पटकावला असून, कु. स्नेहल नरवाडे (६७.८३%) द्वितीय, तर कु. महादेवी तोकलवाड (६६.१७%) तृतीय क्रमांकाचे यश संपादन केले आहे. कला शाखेत कु. संजना पांढरे (७१.८३%) हिने प्रथम, कु. वैश्णवी शिंदे (६५%) द्वितीय, तर कु. मयुरी गंगुलवार (६३.१७%) हिने तृतीय क्रमांक मिळवला आहे.

या यशस्वी निकालाबद्दल गुणवंत विद्यार्थिनी, त्यांच्या पालकांसह सर्व विषय शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, उपाध्यक्ष दत्तात्रय पाटील होटाळकर, सचिव सिंधूताई होटाळकर, संचालक भाऊराव (दादा) पाटील होटाळकर तसेच प्राचार्य फाजगे यांनी अभिनंदन करून कौतुक केले आहे.

यमुनाबाई कॉलेजने ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षण देत विद्यार्थिनींना घडविण्याचे कार्य सातत्याने केले आहे. शिस्तबद्ध शिक्षणपद्धती, अनुभवी शिक्षकवर्ग आणि विद्यार्थिनींची जिद्द यामुळेच ही उल्लेखनीय यशाची परंपरा टिकून आहे.

या निकालामुळे संपूर्ण नायगाव पंचक्रोशीत कॉलेजचे सर्वत्र कौतुक होत असून, संस्थेने पुन्हा एकदा शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती...

शिवार

फुलझाडांच्या लागवडीचा हंगाम

खरीप हंगामात पाऊस भरपूर पडत असल्याने हा हंगाम फुलझाडांच्या लागवडीसाठी उत्तम असतो. मात्र या पिकांच्या लागवडीसाठी चांगला निचरा असलेली व भरपूर सेंद्रिय पदार्थयुक्त जमिनीची निवड करावी. व्यापारी उत्पादनासाठी तसेच शोभेसाठी म्हणून या पिकांची लागवड करताना सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करावा.

खरीप हंगामात झेंडू, गॅलार्डिया, ॲस्टर, शेवंती, चांदणी, झिनिया, कॉसमॉस, सूर्यफूल, टिथोनिया, बाल्सम, सिलोसिया, गॉन्फ्रेना, सालव्हिया, हॉलीहॉक, कॉक्स कोंब इत्यादी फुलझाडांच्या लागवडीसाठी अनुकूल काळ असतो. यापैकी झेंडू, ॲस्टर, गॅलार्डिया, चांदणी, डेझी इत्यादी फुलझाडांची व्यापारी तत्त्वावर लागवड केली जाते. इतर फुलांची बागांमध्ये ताटवे करून लागवड केली जाते. सुट्या फुलांसाठी ॲस्टर, झेंडू, गॅलार्डियाची लागवड केली जाते. कट फ्लॉवरसाठी ॲस्टर, कॉक्स कोंब, अमरॅन्थस ही फुलझाडे लावतात तर फिलरसाठी सोनतुरा हे पीक लावतात.

हवामान अन् जमीन...

खरीप हंगामी फुलझाडांना उष्ण व दमट हवामान चांगले मानवते. चांगल्या वाढीसाठी दिवसाचे २५-३० अंश सेल्सिअस व रात्रीचे १५-२० सेल्सिअस तापमान लागते. सरासरी १५-२५ सेल्सिअस तापमानात चांगली वाढ होते. हवेतील चांगला दमटपणा व ६० ते ७० टक्के आर्द्रता या पिकांना मानवते. उत्तम वाढीसाठी चांगल्या निचऱ्याची मध्यम जमीन (सामू ६.५) निवडावी. जमीन सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध असावी. कुंडीमध्ये लागवडीसाठी एक भाग शेणखत अधिक एक भाग पोयट्याची माती असे १:१ प्रमाणाचे मिश्रण तयार करून केलेले माध्यम वापरावे.

पूर्वमशागत करताना...

एकदा खोल नांगरट व दोनवेळा कोळपणी करून जमीन भुसभुशीत करून घ्यावी. शेवटची कोळपणी करताना हेक्टरी ३० टन शेणखत मातीत चांगले मिसळावे. पुर्वमशागतीनंतर सपाट वाफे किंवा सरी वरंबे तयार करावेत. कुंडीतील लागवडीसाठी कुंडीच्या तळाशी वाळलेला पालापाचोळा टाकून माती मिश्रणात १००-१५० ग्रॅम १५:१५:१५ हे खत मिसळून कुंड्या भराव्यात. कुंड्या भरताना वरुन एक ते दीड इंच मोकळ्या राहतील याची काळजी घ्यावी.

खते व पाणी व्यवस्थापन

लागवडीवेळी प्रतिहेक्टरी १०० किलो नत्र, २०० किलो स्फुरद, २०० किलो पालाश द्यावे. लागवडीनंतर एक दे दीड महिन्याच्या अंतराने उरलेली नत्राची मात्रा १०० किलो प्रतिहेक्टरी याप्रमाणात द्यावी. दर्जेदार व भरपूर उत्पादनासाठी पीक बहरात असताना २ टक्के (२० ग्रॅम प्रतिलिटर) युरियाची फवारणी करावी. निंदणी करताना रोपांना मातीची भर द्यावी. पिकांना पाऊस नसेल तर आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. जादा पाऊस झाल्यास पाण्याचा योग्य निचरा होईल याची काळजी घ्यावी.

अभिवृद्धी व लागवड पद्धत

खरीप लागवड ही बियापासून केली जाते. बहुतांश पिकांच्या बिया लहान असल्यामुळे रोपे तयार करावीत. रोपे गादीवाफा किंवा लाकडी ट्रे किंवा कुंड्यांमध्ये तयार करावीत. पावसाळ्याच्या सुरवातीला वाफ्यावर बियांची पेरणी करावी. बी पेरणीपूर्वी बियाणास कॅप्टन २ ग्रॅम प्रतिलिटर चोळावे. बी जमिनीत अर्धा ते एक सें.मी. खोल पेरावे. पेरणीसाठी दोन ओळीतील अंतर १० सें.मी. ठेवावे. पेरणीनंतर बी बारीक माती व शेणखत यांच्या मिश्रणाने झाकावे व ताबडतोब पाणी द्यावे. उगवणीनंतर पाणी देणे, तण काढणे इत्यादी कामे वेळेत करावीत. रोपांची पुनर्लागवड ४-५ पाने आल्यावर किंवा रोपांची उंची १०-१५ सें.मी. झाल्यावर करावी. वाफ्यावरून रोपे उपटण्यापूर्वी रोपांना हलके पाणी द्यावे. म्हणजे रोपे उपटताना मुळांना इजा होणार नाही. ढगाळ हवामानात रोपांची पुनर्लागवड करावी. रोप लागवडीनंतर पाणी द्यावे. झेंडू, ॲस्टर, चांदणी, झिनिया, कॉसमॉस, गॅलार्डिया, सालव्हिया, टिथोनिया या फुलझाडांची रोपे तयार करून लागवड करतात. शेवंती, झेंडू लागवड कोवळ्या छाट्यापासून रोपे तयार करून करतात. शेवंती व डेझीची लागवड फुटव्यापासूनही करता येते. सूर्यफूल, हॉलीहोक आदी फूलझाडांच्या बिया असतात. त्यामुळे त्यांची लागवड सरळ बी फेकून केली जाते. निशिगंधाची लागवड कंद लावून करतात. टीप : कंपनीकडूनच बियाणे प्रक्रिया केली असल्यास पुन्हा वेगळी करू नये.

लागवडीचे अंतर व वेळ

फुलझाडांची वाढ व जमिनीच्या मगदुरानुसार लागवड ३०x३०, ३०x४५ अथवा ४५x४५ सें. मी. अंतरावर करावी. लागवड जून-जुलै महिन्यात करावी.

संत्रावर्गीय फळ
तोडणी अन् हाताळणी!

संत्रावर्गीय फळांचा आकर्षक रंग, स्वाद, चव टिकून राहणे महत्त्वाचे असते. यासाठी फळांची काळजीपूर्वक तोडणी आणि हाताळणी फार महत्त्वाची असते. लिंबूवर्गीय फळांना चांगले दर मिळण्यासाठी काढणीपश्चात तंत्रज्ञानाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. ग्राहकांपर्यंत फळे पोहोचेपर्यंत २० ते २५ टक्के फळे खराब होतात. अयोग्य हाताळणी, पॅकिंग व वाहतूक, साठवणुकीच्या अपुऱ्या सुविधा व तोडणीनंतरच्या प्रक्रियेचा अभाव या कारणांमुळे फळे खराब होतात. संत्रा फळांची प्रत प्रामुख्याने लागवडीचे नियोजन, बागेच्या मशागतीच्या पद्धती, पीक व्यवस्थापन, काढणी आणि काढणीपश्चात व्यवस्थापनावर अवलंबून असते.

फळांची तोडणी सकाळ किंवा संध्याकाळच्या वेळी करावी. दमट हवामानात व पावसाळ्यात फळे तोडू नयेत. तोडलेली फळे उन्हामध्ये ठेवू नयेत. तोडणी अर्धा ते पाऊण भागावर पिवळसर नारिंगी रंगाची छटा आल्यावर करावी. फळांच्या रसामध्ये किमान १० टक्के एकूण विद्राव्य घटक (TSS) आणि एकूण विद्राव्य आम्लाचे प्रमाण १४ पेक्षा जास्त असलेली संत्रा फळे स्वादिष्ट आणि दर्जेदार असतात. लिबलिबीत फळे वाहतुकीसाठी योग्य नसतात. घट्ट, गुळगुळीत फळे वाहतुकीस व साठवणुकीस योग्य असतात. योग्य परिपक्वता व आकर्षक रंगासाठी निवडक संत्री ३ ते ४ वेळा तोडणी करून काढावीत. मोसंबी फळांमध्ये १० टक्के शर्करायुक्त पदार्थ व ४०-४५ टक्के रस असणे आवश्यक असते. कागदी लिंबात किमान ५० टक्के रस असणे आवश्यक आहे.



पॅकिंगहाऊसमधील नियोजन

- अहरितीकरण : फळाचे हरित रंगद्रव्य (क्लोरोफिल) कमी करून आकर्षक नारिंगी रंग विकसित करण्यासाठी अहरितीकरण केले जाते. ही प्रक्रिया अत्यावश्यक असेल तरच करावी. चांगल्या रंगाच्या फळांची तोडणी केल्यास अहरितीकरणाची आवश्यकता नसते. अहरितीकरणामुळे फळे जास्त काळ टिकून राहतात. यासाठी जास्त आर्द्रता (९० ते ९५ टक्के), योग्य तापमान (२५-२७ अंश सेल्सिअस) आणि इथिलीन वायूची योग्य मात्रा (५ ते १० पीपीएम) असणे आवश्यक आहे. अहरितीकरण ४८ तासांपेक्षा जास्त वेळ करू नये. फळे तोडणीपूर्वी १५ दिवसांच्या अंतराने कार्बेन्डाझिम २ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. अहरितीकरण करण्यापूर्वी २ ग्रॅम कार्बेन्डाझीम प्रतिलिटर पाण्यात मिसळून त्यात फळे बुडवून घ्यावीत. यामुळे साठवणुकीदरम्यान देठाच्या बाजूने होणारी कूज कमी होते. फळे शीतगृहामध्ये १ ते २ महिने साठवून नंतर विक्री करायची असल्यास, अहरितीकरणाची आवश्यकता नसते. शीतगृहातील साठवणुकीदरम्यान फळांना नैसर्गिक नारिंगी रंग येतो.
- स्वच्छता : प्रतवारी यंत्राच्या पट्ट्यावरून जाणारी ओबडधोबड आकाराची, मोठ्या देठाची, अपरिपक्व, अतिपरिपक्व, पोला, खरचटलेली, हिरव्या रंगाची, कीड, रोगग्रस्त आणि जास्त लहान, मोठी फळे काढून टाकावीत. फळे स्वच्छ धुऊन घ्यावीत. फळे स्वच्छ करणाऱ्या यंत्राचे ब्रश क्लोरिनने (१०००पीपीएम) ओले करावेत. फळांवर मेणाची प्रक्रिया करण्यापूर्वी फळांवरील पाणी स्पॉंज रोलरने काढावे.
- मेणाची प्रक्रिया : फळे पूर्णपणे कोरडी झाल्यानंतर १ ग्रॅम कार्बेन्डाझिम प्रति लिटर मेणाच्या द्रावणात स्टेफ्रेश हायशाईन वॅक्स २.५ टक्क्यांची फळांवर प्रक्रिया करावी. मेणाची प्रक्रिया करण्यापूर्वी वॅक्सिंग यंत्राचे सर्व ब्रश बुरशीनाशक युक्त मेणाच्या द्रावणाने ओले करावेत. या प्रक्रियेवेळी यंत्राची गती योग्य ठेवावी. त्यामुळे फळांवरील अनावश्यक ब्रशिंग टाळले जाईल. टनेल ड्रायर यंत्रामध्ये फळांवरील मेण ५०-५५ अंश सेल्सिअस तापमानावर सुकवावे.
- प्रतवारी : फळांची आकारानुसार यंत्रावर प्रतवारी करावी. साधारणतः संत्र्याचा व्यास ५.५० ते ८.५० सेंमी असतो. बॉक्समध्ये पॅक केलेल्या फळांच्या व्यासात ०.६० ते ०.७५ सेंमी पेक्षा जास्त फरक ठेऊ नये. अन्यथा पेटीमध्ये फळांचे योग्य पॅकिंग होत नाही. फळांची प्रतवारी लहान (५.५० ते ६.१० सेंमी), मध्यम (६.११ ते ६.७० सेंमी), मोठी (६.७१ ते ७.३० सेंमी) व खूप मोठी (७.३१ ते ८.०० सेंमी) अशी करावी. वाहतूक व हाताळणी दरम्यान पेटीतील फळे हलण्याची शक्यता असते. यासाठी प्रतवारी केलेल्या फळांची हाताने पॅकिंग करावी. फळांच्या थरांमध्ये कोरूगेटेड बोर्डला (५ प्लाय) छिद्र करावे.

पॅकिंग बॉक्स

रेग्यूलर, युनिव्हर्सल किंवा टेलिस्कोपिक पद्धतीच्या हवेशीर कोरूगेटेड बोर्डच्या बॉक्सचा वापर करावा. बॉक्सची कॉम्प्रेशन क्षमता ३६० ते ४०० किलो असावी. तीन किंवा ५ प्लायच्या कोरूगेटेड प्लेटचा वापर कुशन म्हणून करावा. फळातील दोन थरांमध्ये, पेटीच्या तळाला व सर्वात वर कुशन टाकावे. कोरूगेटेड बोर्डाच्या पेटीमध्ये तणसचा वापर टाळावा. शीतगृहामध्ये साठवण करण्यासाठी पॉलीप्रोपोलीन प्लास्टिक लॅमिनेशन केलेल्या पेट्या वापराव्यात. पेटीमध्ये हवा खेळती राहण्यासाठी दोन्ही बाजूला छिद्र करावेत. तसेच पेटी उचलण्यासाठी दोन्ही बाजूंनी लांब आकाराचे छिद्र करावेत. देशांतर्गत बाजारासाठी ५० सेंमी लांब, ३० सेंमी रुंद, आणि ३० सेंमी उंच पेट्या निवडाव्यात. निर्यातीसाठी वेगळ्या प्रकारच्या बॉक्सची आवश्यकता असते. निर्यातीसाठी ७ ते १० किलोचे बॉक्स वापरले जातात. बॉक्सवर फळांचे वाण, वजन, संख्या, पत्ता आदी माहिती असणे आवश्यक आहे.

तोडणीवेळी घ्यावयाची काळजी

पारंपरिक पद्धतीत फळे पीळ देऊन व ओढून तोडली जातात. फळांच्या देठाला इजा आणि छिद्र पडू न देता तोडणी करणे आवश्यक असते. फळे तोडण्यासाठी फळे तोडण्याच्या कात्रीचा वापर करावा. मात्र, देठ लहान ठेवून तोडणी करावी लागत असल्यामुळे तोडणीचा वेग कमी होतो. ज्या फळांची पारंपरिक पद्धतीने तोडणी नसेल त्यांची कात्रीने तोडणी करावी. तोडणीदरम्यान फळांच्या देठाला व गोल तोटीस (कॉलर) इजा झाल्यास, त्याजागी ३ ते ४ दिवसांनंतर काळ्या, गर्द भुऱ्या रंगाचा डाग दिसू लागतो. यामुळे फळांचा दर्जा कमी होऊन बाजारात योग्य किंमत मिळत नाही. फळे विक्रीला पाठवताना चांगली व खराब, खाली पडलेली फळे एकत्र मिसळू नयेत. तोटी असलेली व खाली पडलेली फळे काढून टाकावीत.

पॅकिंग हाऊसपर्यंत वाहतूक

तोडणीनंतर बागेतच तणसावर फळांची प्रतवारी करणे टाळावे. तोडलेली फळे पिशवीतून प्लास्टिकच्या क्रेटमध्ये एकत्र करावीत. प्लास्टिकचे क्रेट्स सावलीत ठेवावेत. फळे परंपरागत पद्धतीप्रमाणे सुकवण्यास ठेवल्यामुळे निस्तेज होतात. अशा फळांना योग्य बाजारभाव मिळत नाही. वाहतुकीदरम्यान प्लास्टिकच्या क्रेटखाली तणसाचा थर द्यावा. वाहनाला ताडपत्रीने झाकावे. वाहनामध्ये हवा खेळती राहून तापमान कमी करण्यास चहुबाजूंनी जागा ठेवावी. फळांचा ताजेपणा टिकवण्यासाठी, तोडणीनंतर त्वरित प्रक्रिया व पॅकिंग करणे आवश्यक आहे.



- पॉलीइथिलिन (प्लास्टिक) चे आवरण : फळांचा ताजेपणा टिकवून ठेवण्यासाठी २५ ते ५० मायक्रोमीटर (१०० ते १२० गेज) जाडीच्या प्लास्टिक बॅगचे आतील बाजूला आवरण द्यावे. त्यावर फळे व्यवस्थित रचून पॅकिंग करावे. प्लास्टिक बॅगच्या १.५ टक्के भागावर हवेसाठी अर्धा सेंमी व्यासाचे लहान छिद्र ठेवावे. हे छिद्र मार्च- एप्रिलच्या शुष्क पण उष्ण हवामानात आवश्यक असते.
- शीतगृहात साठवण : निर्यातीदरम्यान किंवा शीतगृहात साठवण करण्यासाठी फळांच्या पेट्यांचे फोर्स एअर कुलिंग तंत्रज्ञानाने ६ ते ७ अंश सेल्सिअस तापमानावर शीतकरण करावे. शीतगृहात ६-७ अंश सेल्सिअस तापमान व ९०-९५ टक्के आर्द्रता असल्यास फळे ४५ ते ५० दिवसांपर्यंत चांगली ताजी राहतात. तोडणीनंतर ३-४ दिवसांत पॅकिंग, वाहतूक व विपणन करायचे असल्यास, शीतकरणाची आवश्यकता लागत नाही. शीतगृहातून संत्री काढल्यावर फळ सडण्याने होणारे नुकसान टाळण्यासाठी हाताळणी व विपणन करावे.

रोपवाटिका व्यवसाय!

रोपवाटिका किंवा कोणत्याही झाडाची अभिवृद्धी हे शास्त्र आणि कला यांचा संगम असतो. शेतकरी चांगल्या बियांचा सतत शोध घेऊन त्याद्वारे पीक घेत असतो. काही पिकांची पेरणी केली जाते, तर काही पिके हे रोपे तयार करून त्यांची पुनर्लागवड केली जाते. त्यात फळझाडे, वनशेतीतील काही दीर्घायू झाडे यांच्या निर्मितीचे तंत्र वेगवेगळे असते. या तंत्राचा काळजीपूर्वक वापर करावा लागतो. कारण बियांपासून अभिवृद्धी करताना मूळ झाडातील गुणधर्म जसेच्या तसे येतीलच, याची खात्री राहत नाही. त्यामुळे बियांपासून वाढवलेली झाडे एकसारखी वाढत नाहीत, त्यांच्या फळांच्या गुणवत्तेतही फरक जाणवतात. हे टाळण्यासाठी कलम करण्याच्या विविध पद्धती अगदी प्राचीन काळापासून वापरल्या जातात. उदा. चीनमध्ये लिची झाडावर गुटी कलम, तर भारतात कंदमुळापासून अभिवृद्धीचे तंत्र प्राचीन काळापासून अवगत आहे.

रोपवाटिकेची गरज अन् संधी...

रोपवाटिका व्यवसायात योग्य जातींचे बी आणून, त्याची रोपे तयार केली जातात. त्यांची चांगली किंमतही मिळते. मात्र, यासाठी रोप निर्मात्यांची विश्वासार्हता महत्त्वाची असते. ही विश्वासार्हता सातत्यपूर्ण गुणवत्ता मिळवणे आणि टिकवण्यातून येत असते. उत्तम दर्जाचे रोपातून चांगले पीक आणि उत्तम उत्पादन मिळते, हे माहीत असल्याने विश्वासार्हता असलेल्या रोपवाटिकेतून शेतकरी चार पैसे अधिक देऊनही रोपे खरेदी करत असल्याचा अनुभव आहे. अलीकडे फळबागेखालील क्षेत्रात वाढ होत आहे. त्यामुळे नवीन फळझाडांची रोपे बनवणे शक्य आहे. त्याचप्रमाणे फुलझाडांच्या रोपांनाही चांगली मागणी असते. यात घरगुती सुशोभीकरणासाठी आणि व्यावसायिक लागवडीची असे दोन प्रकार पडतात. या दोन्हीमध्ये चांगली संधी आहे. उलट भाजीपाल्याच्या रोपांपेक्षा फळांची आणि फलांची कलमी रोपे अधिक किमतीने विकली जातात. त्यातून अधिक फायदा होतो.महाराष्ट्र आणि अन्य राज्यातूनही फळबाग लागवडीच्या विविध योजना राबवल्या जात असतात. अन्य विविध योजनांमध्येही झाडांचा समावेश असतो.

कोणत्याही पिकाचे किमान दीड ते दोन महिने आधी नियोजन केले असल्यास स्वत:च स्वत:ची रोपे तयार करता येतात. मात्र, अनेक शेतकरी असे नियोजन करत नसल्यामुळे बाहेरून रोपे खरेदी करावी लागतात. ही बाजारपेठ गृहीत धरून काही शेतकऱ्यांना रोपवाटिका व्यवसाय करणे शक्य आहे. त्यातून चांगले अर्थार्जन होऊ शकते.

रोपवाटिकेचे फायदे

- रोपवाटिकेमध्ये काळजी घेत बसण्याऐवजी दर्जेदार रोपे उपलब्ध होऊ शकतात.
- कलमे किंवा रोपे न करता त्वरित फळबाग लावता येते.
- रोप-कलमे निर्मितीचा वेळ, पैसा व श्रम वाचतात.
- रोपांच्या गुणवत्तेची खात्री घेता येते.
- दुर्मीळ कलमे सहजासहजी उपलब्ध होतात.

जनावरांचे आगीपासून करा संरक्षण

आगीची झळ बसलेली जनावरे पूर्णपणे बरी होण्यासाठी प्रदीर्घ कालावधीसाठी औषधोपचार करावा लागतो, जो की पशुपालकाला आर्थिकदृष्ट्या परवडणारा नसतो. त्यामुळे आगीपासून जनावरांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना काळजीपूर्वक अंमलात आणाव्यात.

- गोठ्याची जागा शक्यतो विद्युतवाहक खांब किंवा तारा यांच्यापासून सुरक्षित अंतरावर असावी. गोठ्याचे बांधकाम शक्यतो लाकूड, बांबू व शेतातील काड, पालापाचोळा किंवा उसाची पाचट यापासून केलेले नसावे.
- सिमेंट किंवा लोखंडी खांब व पत्र्याचा वापर करून केलेला गोठा आगीमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी उपयुक्त असतो.
- चरायला जाणारी जनावरे गोठ्यात बांधताना साखळदंड व नायलॉन दोरऐवजी सुती दोर वापरून बांधावीत. जनावरांवर वेळोवेळी लक्ष देण्याच्या दृष्टीने गोठ्याचे बांधकाम राहत्या घरापासून दूर न करता घराच्या जवळ करावे. जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ उपाययोजना अंमलात आणता येतील.
- गोठा व परिसरात ज्वलनशील पदार्थ ठेऊ नयेत. जनावरे गोठ्यात बांधताना वेसणीऐवजी म्होरकीने बांधल्यास आग किंवा तत्सम अपघातावेळी जनावरांना दोर तोडून गोठ्यातून तत्काळ मुक्त होण्यासाठी सुकर होईल.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून महाराष्ट्रातील प्रस्तावित हाय-स्पीड राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचा आढावा

नवी दिल्ली (प्रतिनिधी) – महाराष्ट्रातील विविध महत्त्वपूर्ण महामार्ग विकास प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा आज केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी राज्यातील पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्यासाठी सुरू असलेल्या आणि प्रस्तावित कॉरिडॉर प्रकल्पांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्रातील रस्ते संपर्क अधिक सक्षम करणे, लॉजिस्टिक कार्यक्षमता वाढविणे आणि प्रादेशिक आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी प्रकल्पांच्या नियोजन व अंमलबजावणी प्रक्रियेला गती देणे या उद्देशाने ही आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी नागपूर-भंडारा टप्प्याचे सहा पदरीकरण, तळोदा-बुऱ्हाणपूर टप्प्याचे चार पदरीकरण, दुर्ग-गडचिरोली-मंचेरियाल कॉरिडॉर, गडचिरोली-कांकेर (रायपूर-विशाखापट्टणम) कॉरिडॉर, ग्वाल्हेर-नागपूर कॉरिडॉर, नागपूर-हैदराबाद कॉरिडॉर, भंडारा-रायपूर टप्प्याचे सहा पदरीकरण, लखनादोन-दुर्ग-रायपूर कॉरिडॉर, नागपूर-अमरावती टप्प्याचे सहा पदरीकरण, एनएच-४४ वरील मध्य प्रदेश-महाराष्ट्र सीमा-नागपूर बायपास-बोरखेडी टप्प्याचे तसेच पुणे-सातारा टप्प्याचे सहा पदरीकरण या प्रकल्पांचा समावेश होता.

या बैठकीत महाराष्ट्रातील राष्ट्रीय महामार्गांवरील एकूण ५२७ किमी लांबीच्या नऊ बीओटी प्रकल्पांचाही सखोल आढावा घेण्यात आला. यात शिरूर-अहिल्यानगर, अहिल्यानगर-वडाळा, वडाळा-छत्रपती संभाजीनगर, छत्रपती संभाजीनगर-जालना, जालना-वातूर, नांदेड-नरसी-देगलूर, जाम-वरोरा, वरोरा-चंद्रपूर-बामणी आणि मलकापूर-चिखली या कॉरिडॉरचा समावेश आहे.

'राजा शिवाजी' सिनेमा टॅक्स फ्री करा; शिवसेना ठाकरे गटाचे आ. दानवे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

मुंबई (प्रतिनिधी) – महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्य गाथावर आधारीत 'राजा शिवाजी' हा सिनेमा प्रदर्शित झाला. या सिनेमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याची कथा प्रेक्षकांना रुपेरी पडद्यावर अनुभवता येणार आहे. सध्या बॉक्स ऑफिसवर या सिनेमाने जोरदार कमाई करण्यास सुरुवात केली आहे. अवघ्या तीन दिवसांत या सिनेमाने उत्तम कामगिरी केली. या सिनेमात तगड्या कलाकारांची फौज पाहायला मिळत आहे. सलमान खानच्या भूमिकेचं विशेष कौतुक करण्यात आलं.

प्रदर्शित झाल्यापासून 'राजा शिवाजी' या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर उत्तम कामगिरी केली आहे. अवघ्या तीन दिवसांत या ऐतिहासिक सिनेमाने ३७ कोटी रुपयांचा आकडा पार केला आहे. लवकरच हा सिनेमा १०० कोटींचा आकडा पार करेल यात शंका नाही. दरम्यान, अलिकडेच या चित्रपटाविषयी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नेते अंबादास दानवे यांनी एक मोठी मागणी केली आहे. 'राजा शिवाजी' हा सिनेमा करमुक्त केला जावा, अशी मागणी केली आहे. विधानपरिषदेतील माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी यासंदर्भात पत्र लिहिले आहे. हे पत्र त्यांनी मुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस यांना पाठवले आहे. या पत्रात त्यांनी म्हटलं की, 'छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनकार्य, त्यांचे अद्वितीय शौर्य, दूरदृष्टी आणि स्वराज्य स्थापनेचा महान इतिहास हा महाराष्ट्राच्या तसेच संपूर्ण देशाच्या अस्मितेचा कणा आहे. त्यांनी स्थापन केलेले 'हिंदवी स्वराज्य' हे केवळ राज्यव्यवस्था नसून न्याय, समानता, स्त्रीसुरक्षा, शेतकरी संरक्षण आणि धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांवर आधारित एक आदर्श शासनपद्धती होती. त्यांच्या जीवन कार्यावर आधारित अभिनेता रितेश देशमुख लिखित आणि दिग्दर्शित 'राजा शिवाजी' हा चित्रपट कर मुक्त करण्यात यावा. आपल्या स्तरावरुन संबंधिताना निर्देश द्यावेत, अशी मागणी या पत्राद्वारे मी आपणाकडे करीत आहे', असं त्यांनी आपल्या पत्रात म्हटलं आहे. त्यांनी या पत्राचे ट्विटही आपल्या अधिकृत एक्स अकाउंटवर शेअर केले आहे.

अखेर पंढरपूर कॉरिडॉरला मंजुरी, मंत्रिमंडळ शिखर बैठकीत निर्णय

सोलापूर (प्रतिनिधी)– पंढरपूर कॉरिडॉर आणि विकास आराखड्यासंदर्भात झालेल्या मुंबईत मंत्रिमंडळ शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री जयकुमार गोरे, वनमंत्री गणेश नाईक, आमदार समाधान आवताडे यांच्यासह महसूल आणि जलसंपदा विभागाचे सचिव, जिल्हाधिकारी व इतर अधिकारी उपस्थित या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत १ ऑगस्टपर्यंत भूसंपादन आणि बाकीची प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असल्याचे आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर दौऱ्यातच पंढरपूर विकास आराखडा आणि कॉरिडॉर संदर्भात भूमिका स्पष्ट केली होती. त्यानंतर, आता मंजुरी देण्यात आली आहे.

तरुणाच्या डोक्यात अडकला कोयता: जखमी स्वतःच सायन रुग्णालयात दाखल

मुंबई (प्रतिनिधी) – मुंबई शहरातील वाढत्या गुन्हेगारीची झलक दाखवणारी एक धक्कादायक घटना सायन परिसरात समोर आली आहे. त्यात एक तरुण डोक्यात धारदार कोयता अडकल्याच्या स्थितीत स्वतःच रुग्णालयात चालत आल्याचे दिसून येत आहे. त्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियात चांगलाच व्हायरल झाला असून, यामुळे नागरिकांत भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणाचा काही व्यक्तींशी वाद झाला होता. या वादातूनच त्याच्यावर कोयत्याने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात कोयता थेट त्याच्या डोक्यात अडकला. मात्र, गंभीर जखमी असूनही या तरुणाने हार न मानता स्वतःच सायन रुग्णालय गाठले. त्याला त्या स्थितीत पाहून रुग्णालयातील सर्वजण हादरले. व्हायरल व्हिडिओमध्ये हा तरुण रुग्णालयात शांतपणे उभा राहून उपचाराची वाट पाहताना दिसत आहे. यामुळे परिस्थितीची गंभीरता अधिकच अधोरेखित होते.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आणि 'स्वप्ननगरी' म्हणून ओळखली जाते. येथे दररोज हजारो लोक आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी येतात. इथे कोणीही उपाशी राहत नाही अशी ओळख असलेल्या या शहरात दुसऱ्या बाजूला गुन्हेगारीच्या घटनांमध्येही वाढ होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. सायनमधील ही घटना त्याचेच एक भीषण उदाहरण म्हणून पाहिली जात आहे.

या व्हिडिओवर सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. अनेकांनी जखमी तरुणाला तातडीने उपचार मिळायला हवेत, अशी मागणी केली आहे. काहींनी या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. विशेष म्हणजे, व्हिडिओमध्ये जखमी तरुण उपचारासाठी थांबलेला असताना त्याच्या आसपास वैद्यकीय कर्मचारी दिसत नसल्याची बाबही अनेकांच्या संतापाचा विषय ठरली आहे.

जेआरडी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीची स्थापना ही शैक्षणिक क्रांती -शिवाजीराजे पाटील

वसमत (प्रतिनिधी) – सध्याचा काळ हा माहिती तंत्रज्ञानाचा असून ज्ञानस्फोटाचे युग म्हणून ओळखला जातो. प्रत्येक क्षणी नवनवीन शोध लागत असताना, एआयने व्यापलेल्या या युगात स्वतःला सतत अद्ययावत ठेवणे ही काळाची गरज बनली आहे. तंत्रकुशल आणि सर्वगुणसंपन्न तरुणांना जागतिक बाजारपेठेत मोठी संधी उपलब्ध होणार असल्याने ग्रामीण भागात दर्जेदार तंत्रशिक्षण देणाऱ्या जेआरडी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीसारख्या संस्था ही खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांती ठरतील, असे प्रतिपादन जवाहरलाल नेहरू लीडरशिप इन्स्टिट्यूटचे मास्टर कोच शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी केले. जेआरडीआयटीतर्फे आयोजित शिक्षक सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण फाउंडेशनचे सचिव आतिष साळुंके दांडेगावकर होते.

या प्रसंगी जेआरडीआयटीचे विश्वस्त स्मितल दांडेगावकर, जिजाऊ अर्बन बँकेचे अध्यक्ष डॉ. सोपान क्षीरसागर, प्रविण शेळके, एम जीएम अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. विठ्ठलराव जाधव, सुरेश वगेवार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी सांगितले की, शिक्षणाचे व्यापारीकरण न करता विद्यार्थीहित जपणाऱ्या संस्थांची प्रगती नेहमीच उंचावत राहते. जेआरडीआयटीच्या टीमने प्रात्यक्षिकांवर आधारित

शिक्षण, संशोधनाला चालना, तसेच जीवनमूल्ये व संस्कार जपणारी पिढी घडविण्यासाठी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. अध्यक्षीय समारोपात आतिष दांडेगावकर यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अफाट क्षमतेवर प्रकाश टाकत, योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ते राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करू शकतात, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्मितल दांडेगावकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रकाश इंगळे यांनी, तर आभार प्रदर्शन राजेश भालेराव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विजय कडतन, गणेश कमळू, विवेक मोहिते, संदीप भालेराव, रमाकांत अवधूतवार, विठ्ठल नेव्हल, मयूर स्वामी यांच्यासह जेआरडीआयटी व यशवंतराव चव्हाण फाउंडेशनच्या संपूर्ण टीमने परिश्रम घेतले.

बारामतीकरांचा अभिजीत बिचुकलेला दणका, पारड्यात फक्त ३३३ मतं तर करुणा मुंडेंना ३०१ मतं

मुंबई (प्रतिनिधी) – राज्यात बारामती आणि राहुरी या विधानसभा मतदारसंघांतील पोटनिवडणुकीची मतमोजणी आज, सोमवारी पार पडली. संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत विद्यमान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार ह्या विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्या असून विरोधातील सर्वच उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे.

तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी बारामती मतदारसंघात तर भाजप आ. शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळं

रिक्त झालेल्या जागेसाठी राहुरीत पोटनिवडणूक पार पडली. बारामतीमध्ये उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तर राहुरीमध्ये शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांच्या विजयाचा विश्वास समर्थकांनी व्यक्त केला होता.

बारामतीची निवडणुकीचा निकाल हा फक्त औपचारिकता मानला जात होता, महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी मोठी आणि विक्रमी आघाडी घेतली असून या आधीचे मताधिक्याचे विक्रम त्यांनी मोडीत काढले आहेत. या मतदारसंघात बिग बॉस फेम अभिजीत बिचुकले यांनी देखील अर्ज दाखल केला होता. त्यांना चौथ्या क्रमांकाची फक्त ३३३ मते मिळाली तर करुणा मुंडे पाचव्या क्रमांकावर फेकल्या गेल्या आहेत. बारामती मतदारसंघात नोटाने तब्बल ७७४ मते घेतली आहेत. अभिजीत बिचकुले यांच्यापेक्षा प्रा. आर.वाय. घुटुकडे यांना ९३५ मते, विराज शिंदे यांना ५३३ मते आणि चंद्रकांत वाघमोडे यांना ४०३ मते अशा अत्यल्प मतांवर विरोधकांना मतदारांनी चपराक दिली आहे.

पश्चिम बंगालचा विजय सरळ मार्गी नाही - संजय राऊत यांची टीका

मुंबई (प्रतिनिधी) – आज पश्चिमन बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि आसामच्या निवडणुकांची मतमोजणी सुरू आहे. यात पश्चिम बंगालमध्ये भाजपचा विजय होताना दिसत आहे. तर केरळमध्ये काँग्रेसला अधिक मत मिळतंय दिसत आहे. या सगळ्या परिस्थितीवर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच पश्चिम बंगालचा विजय हा सरळ मार्गाने मिळवलेला नसल्याची टीका राऊत यांनी केली आहे.

संजय राऊत म्हणाले, लुटालूट सुरू आहे. सीआरपीएफची मदत भाजपच्या कार्यकर्त्यांना होईल. हे जरी असले तरी भारतीय जनता पक्ष पश्चिम बंगालमध्ये सत्ता घेताना दिसत आहे. मोदी आणि शहा यांचे जे स्वप्न होते की पश्चिम बंगालमध्ये निवडणूक जिंकावी त्यांच्या कार्यकिर्दीत. हे त्यांचे सवपान पूर्ण झाले आहे. त्यांचे स्वप्न पूर्ण झाल्यामुळे कदाचित मोदी आणि शहा यांचे राष्ट्रीय स्तरावरचे कार्य संपलेले दिसत आहे.

स्पिरिट एअरलाईन्स ३४ वर्षांनंतर बंद, सर्व उड्डाणे रद्द ; १७ हजार नोकऱ्यांवर संकट

मुंबई (प्रतिनिधी) – पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संकट आणि इंधनाच्या वाढत्या किंमतींच्या पार्श्वभूमीवर अत्यंत कमी खर्चातील अमेरिकन एअरलाईन कंपनी स्पिरिट एअरलाईन्सने ३४ वर्षांनंतर आपल्या संचालनाला तात्काळ प्रभावाने बंद करण्याची घोषणा केली आहे. कंपनीने आपल्या सर्व उड्डाणे रद्द केली असून ग्राहक सेवा देखील बंद केली आहे. एअरलाईनच्या या निर्णयामुळे सुमारे १७ हजार लोकांच्या नोकऱ्यांवर संकट निर्माण झाले आहे.

स्पिरिट एअरलाईन्सने शनिवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, व्हाईट हाऊसकडून संभाव्य आर्थिक मदत (बेलआउट) मिळू न शकल्यामुळे कंपनीने आपल्या संचालनाला नियोजनबद्ध पद्धतीने बंद करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे, जी तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे. एअरलाईनने स्पष्ट केले की स्पिरिटची सर्व उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.

स्पिरिट एव्हिएशन होल्डिंग्स, इंक., जी स्पिरिट एअरलाईन्सची मूळ कंपनी आहे, तिला ५०० मिलियन डॉलरच्या बचाव करारात यश मिळाले नाही. या

अपयशानंतर कंपनीने आपले कामकाज बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

प्रत्यक्षात, वाढत्या इंधन दरांमुळे आणि इराण युद्धाच्या परिणामामुळे कंपनी आधीपासूनच आर्थिक संकट आणि दिवाळखोरीच्या परिस्थितीशी झुंज देत होती. या बंदीमुळे सुमारे १७ हजार कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर परिणाम होण्याची शक्यता आहे आणि विमानवाहतूक क्षेत्रातील स्पर्धा कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्पिरिट एअरलाईन्सने खेद व्यक्त करत सांगितले की कंपनीने आपल्या संचालनाला नियोजनबद्ध पद्धतीने बंद करण्यास सुरुवात केली आहे, जी तात्काळ प्रभावाने लागू झाली आहे. यामुळे तिकीटांच्या किंमतींमध्ये वाढ झाली असून प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या घडामोडींचे परिणाम दिसू लागले आहेत.

Change In Name

My Old Name is **Arati Babu Salave / Arti** which now I am changing as New Name **Arati Baburao Salave.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Sign By : Arati Baburao Salave
Current Address - H.No. 1-7-789, Samata Nagar, Pavdewadi Naka, Nanded 431602
Mo.No. 9325244814

Change In Name

My Old Name is **KHATTAL AHEMAD KHAN AHEMAD KHAN** which now I am changing as New Name **KHATTAL AHMED KHAN AHMED KHAN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - AHMED KHAN KHATTAL AHMED KHAN, H.No. 2-8-46, NTC Mill Gate, Nanded M.S. 431601 Mo.No. 7887414802

Change In Name

My Old Name is **MOHAMMAD ABUDL MUBEEN** which now I am changing as New Name **ABUDL MUBEEN ABDUL MAJEED.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - ABDUL MAJEED, H.No. 9-5-642/1, Tayed Board, Degloor Naka Nanded
Mo.No. 9960097216

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड
ई-निविदा सूचना क्रमांक (02) सन 2026-27

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड (दूरध्वनी 02462-253711) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील मजुर सहकारी संस्था कडुन ब-1 नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे जि.नांदेड मागवित आहेत. सदरील निविदेमध्ये 05 कामे समाविष्ट असून या निविदेअंतर्गत संपुर्ण माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

1. या निविदेसंबंधी संपुर्ण माहिती खाली दिलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच यापुढील सर्व बदलांची माहिती याच संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
2. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड जि. नांदेड यांना राखुन ठेवला आहे.

www.mahapwd.gov.in
https://mahatenders.gov.in

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

जाहिरप्रगटन
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ११०/२०२६
बालामणी विरुध्द निरंक

अर्जदार :- बालामणी नरसिंग अदमनकर, वय- ६० वर्षे, रा. बाजार गल्ली, बिलोली ता. बिलोली जि. नांदेड

विरुध्द
निरंक
विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत **नरसिंग लक्ष्मण अदमनकर** यांचे अर्जदार ही पत्नी आहे. अर्जदार हे मौजे बिलोली ता. बिलोली जि.नांदेड येथील रहिवाशी आहेत. मयत **नरसिंग लक्ष्मण अदमनकर** यांचा मृत्यु दिनांक **दि.२३/०७/२००३** रोजी मृत्यु झाला आहे. मयताचे आई व वडील हे फार वर्षापुर्वीच मयत झाले आहेत. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **नरसिंग लक्ष्मण अदमनकर** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरुपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक १९/०६/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. ०४ मे, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, बिलोली

जाहिरप्रगटन
बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०९/ २०२६ पुढील तारीख – १९.०६.२०२६

अर्जदार : कुंती सुरेखा कुंती गंगाधर , वय – ३५ वर्षे, व्यवसाय – शेती, रा.जामलम एम. येडपली , जि. निझामाबाद तेलंगाना राज्य.

विरुध्द.

गैरअर्जदार: निरंक

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार ह्यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार हि **मयत लिंगाबाई सोमन्ना शिलमवार** यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार हि **मयत लिंगाबाई सोमन्ना शिलमवार** यांची मुलगी आहे. **मयत लिंगाबाई सोमन्ना शिलमवार** यांचा मृत्यु दिनांक ०२.१०.२०२५ रोजी झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार हि **मयत लिंगाबाई सोमन्ना शिलमवार** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३०/०४/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,
क. लिपीक
दिवाणी न्यायालय व. स्तर,
बिलोली

सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर,
बिलोली

जाहीर प्रगटन

मौजे असदवन ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील शेत गट नं. ११४ मधील प्लॉट नं. ११ ज्याची साईज लांबी – दक्षिण- उत्तर ४० फुट म्हणजे व रूंदी पूर्व-पश्चिम- ३० फुट म्हणजे ज्याचे एकूण क्षेत्रफळ १२०० चौ.फुटाचा प्लॉट प्रशांत पंडितराव मामडे रा. असर्जन नांदेड यांचेकडून मुदखेडे दत्ता दिगांबर रा. चिखलवाडी कॉर्नर नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा- पूर्वेस – प्लॉट नं. १०, पश्चिमेस – प्लॉट नं. १२, दक्षिणेस – प्लॉट नं. १४ व उत्तरेस – २० फुट रूंद रोड.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत मुदखेडे दत्ता दिगांबर यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
मुदखेडे दत्ता दिगांबर
रा. चिखलवाडी कॉर्नर, नांदेड
मो.नं. ९०७५२२२२३३

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

मनपाच्या अतिक्रमण हटाव पथकावर हल्ला

❍ शहर वाहतूक पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे मोठा अनर्थ टळला ❍ जेसीबीचालक जखमी ❍ वाघी रस्त्यावरील घटना

नांदेड (प्रतिनिधी) – महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून शहरात सर्वत्र अतिक्रमण हटाव मोहीम महापौर कविता मुळे आणि आयुक्त डॉक्टर महेशकुमार डोईफोडे यांनी घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत सोमवार दिनांक ४ मे रोजी एनटीसी मील परिसरात वाघी रस्त्यावर अतिक्रमण काढत असताना तेथील काही नागरिकांनी चक्क जेसीबी चालकावर जेसीबीवर चढून प्राणघातक हल्ला गेला. यात जेसीबी चालक गंभीर जखमी झाला असून त्याला एका खाजगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी कर्तव्यावर असलेल्या शहर वाहतूक शाखेच्या दोन पोलिसांनी हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र ही घटना गंभीर असून महानगरपालिका प्रशासनाने याकडे लक्ष घालावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

शहरातील प्रमुख व अंतर्गत रस्ते, चौकासह शहरालगतच्या रस्त्यावरही मोठया प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. शहरातील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी आणि रस्ते मोकळे करण्यासाठी महानगरपालिका आणि पोलीस विभाग यांच्या वतीने संयुक्तपणे मोठी अतिक्रमण विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. या कारवाईत श्रीनगर, वर्कशॉप, देगलूर नाका, शासकीय विश्रामगृह, छत्रपती चौक, काबरा नगर, जुना मोंढा टॉवर ते जुना मोंढा ब्रीज दरम्यानच्या मुख्य रस्त्यावरील सर्व अतिक्रमणे हटवण्यात आली आहेत. याच मोहिमेतंर्गत म हानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन पथक एनटीसी मिल ते वाघी रस्त्यावर दोन्ही बाजूने झालेले अतिक्रमण काढण्यासाठी सोमवारी दुपारी गेले होते. यावेळी कारवाई करण्यास विरोध करून येथील लोकांनी या पथकावर जोरदार हल्ला चढविला. यात काही जणांनी जेसीबी चालक मालू कांबळे यास केबिनमधून खेचून काढत जबर मारहाण केली. बराच वेळ ही मारहाण सुरू होती. यामुळे कांबळे गंभीर जखमी झाले असून त्यास शासकीय रूग्णालानंतर शहरातील एका खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तर अन्य काही कर्मचारी सुद्धा यात जखमी झाले आहेत. या हल्ल्यामुळे रस्त्यावर बराच वेळ गोंधळ उडाला होता, असे अतिक्रमण विभागाचे उपायुक्त अजितपालसिंघ संधू यांनी सांगीतले. तर या घटनेमुळे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांमध्ये संताप पसरला असून आरोपींना तातडीने अटक करून कडक कारवाई करावी अन्यथा काम बंद करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसाय विरोधी मोहीम सुरूच

तिसऱ्या दिवशी ७९ गुन्ह्यांत १६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत; ११७ जणांविरुद्ध कारवाई

नांदेड (प्रतिनिधी) –दिनांक १ ते ३१ मे दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या तिसऱ्या दिवशी नांदेड परिक्षेत्रात गुटखा विक्री करणाऱ्या एका इसमाकडून रुपये १ लाख ५ हजार ९८६ रुपये किंमतीचा गुटखा व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असून, त्यास दहा वर्षे पर्यंत कैद व द्रव्य दंडाची देखील शिक्षा आहे.

त्याचप्रमाणे, दिवसभरात मटका जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण ३७ इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यांच्याकडून ७ लाख ११ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर अवैध दारू विक्री करणाऱ्या ६३ आरोपींविरुद्ध ६२ गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून ५ लाख ६ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यासोबतच शस्त्र अधिनियमान्वये३, कोटपा अन्वये ५, तर इतर अधिनियमाखाली मिळून, एकूण ७९ कारवाया करण्यात आल्या आहेत. यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून १६ लाख ३६ हजार ७३१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपरोक्त कारवाईत नांदेड परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर येथील अधिकारी व अंमलदारांनी भाग घेतला.

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना देता यावी या दृष्टिकोनातून पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाईन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, या क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेजद्वारे पाठवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या हेल्पलाईनवर नागरिकांनी विश्वास दर्शविला असून, परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी सदर हेल्पलाईनची मोठी मदत होत असल्याचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

नांदेड – वाढत्या तापमानामुळे प्रत्येकाच्या जीवाची काहीली होत आहे. त्यात मुके प्राणीही सुटले नाहीत. असाच एक श्वान संवाद अभ्यासिकेसमोर संचालक शंकर शिंगे यांनी पाळीव प्राण्यांना पिण्यासाठी ठेवलेल्या पाण्याच्या हौदात विसावा घेत असल्याचे छायाचित्र प्रल्हाद कांबळे यांनी टिपले आहे.

नसरापूर अत्याचारप्रकरणी ब्राह्मण महासंघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नांदेड (प्रतिनिधी) –नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकल्या मुलीवर झालेल्या अत्याचार व हत्येच्या अमानुष घटनेच्या निषेधार्थ अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी माजी आमदार अमरनाथ राजूरकर, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर, मनपा सभागृह नेता महेश कनकदंडे, प्रितीताई वडवळकर, गंगाबिशन कांकर, अनंत राखे, भाग्यश्री कुलकर्णी, अनिल डोईफोडे, केदार नांदेडकर, पत्रकार किरण कुलकर्णी, सुनील जोशी, संतोष कुलकर्णी, अभय कुळकजाईकर, कृष्णा उमरीकर, गजानन जोशी, शितल खांडिल, सतीशगुरु पोतदार, शैलेश नागापूरकर, गिरीष व्यवहारे, व्यंकटेश कुलकर्णी, शशिकांत देशमुख, सुधीर देशमुख, राजेश कुलकर्णी, दिलीपकुमार शर्मा, सोनू उपाध्याय, गोविंद शर्मा, रमेश मेगदे, मोहिनी दिवाकर, नागेश दत्तात्रय, डी. बी. पारखे, संजय कुलकर्णी, प्रवीण कुलकर्णी, विनोद पांडे, गिरीष नाईक, प्रेमराज शर्मा, सुवर्णा भोरे, मानिनी नांदेडकर, प्रणिता कुलकर्णी, मंगला नाईक, नयना देशपांडे, धनश्री कुलकर्णी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नरसापूर प्रकरणाविषयी नांदेडमधील समाजबांधवांच्या तीव्र भावना शासनापर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन दिले. अ. भा. ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अशा प्रकारच्या गुन्ह्यांमुळे समाजातील नैतिकता आणि सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणात आरोपीला पोलिसांनी अल्पावधीत अटक केली ही बाब स्वागतार्ह असली, तरी पीडितेला न्याय मिळण्यासाठी पुढील प्रक्रिया अधिक कठोर आणि जलद गतीने होणे अत्यंत आवश्यक आहे.

या प्रकरणातील पीडितेला न्याय मिळण्यासाठी पुढील न्यायप्रक्रिया जलद आणि कठोर होणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या प्रकरणाचा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून लवकरात लवकर निकाल द्यावा, तसेच आरोपीस फाशीची शिक्षा सुनावण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अशा प्रकारचे गुन्हे समाजातील नैतिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात, असे नमूद करत गुन्हेगाराला कोणतीही जात किंवा धर्म नसतो, तो केवळ गुन्हेगार असतो, असेही निवेदनात म्हटले आहे.

जुगार अड्डुड्यावर भाग्यनगर पोलिसांची धाड; ९ जणांना अटक

नांदेड (प्रतिनिधी) – शहरातील अरुणोदयनगर भागात सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर भाग्यनगर पोलिसांनी शनिवारी रात्री धाड टाकून ९ जणांना अटक केली. त्यांच्याकडून साडेचार लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला.

तरोडा बु. अरुणोदयनगर भागातील लक्ष्मण पानशॉपजवळ जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती भाग्यनगर पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक संतोष तांबे व पोलीस कर्मचाऱ्यांनी शनिवारी रात्री जुगार अड्ड्यावर छापा टाकला. पैसे लावून अंदर-बाहर नावाचा जुगार खेळताना गौतम दौलत जोंधळे रा. सिद्धार्थनगर, अजिजखान इस्माईलखान रा. पौर्णिमानगर, राहुल गणपत मोरे रा. कल्याणनगर, सागर उत्तमराव सूर्यवंशी रा. संतोषनगर, लक्ष्मण तुकाराम चिंचोके, स्वप्नील प्रकाश गजभारे रा. अरुणोदयनगर, अतुल कवडे रा. राहुल कॉलनी, विठ्ठल धोतरे रा. अरुणोदयनगर व नंदकिशोर कदम रा. पौर्णिम ानगर यांना अटक केली आहे. त्यांच्याविरुद्ध भाग्यनगर पोलीस ठाण्यात जुगाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महानगर भाजपा व्यापारी आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची जम्बो कार्यकारिणी जाहीर

नांदेड (प्रतिनिधी) – भाजप व्यापारी आघाडी महानगर नांदेडच्या नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती नुकत्याच झालेल्या भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडीच्या बैठकीत करण्यात आली. या कार्यकारिणीमध्ये जवळपास सगळ्या संघटनांचे पदाधिकारी यांना स्थान देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याने भाजपा महानगर व्यापारी आघाडीची जम्बो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

या कार्यक्रमात माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण आणि भाजपा प्रदेश महासचिव व माजी आमदार सुनील राणे यांच्या हस्ते, तसेच भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष माजी आमदार अमरनाथ राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली, भाजपा व्यापारी आघाडीचे महानगराध्यक्ष प्रेमकुमार फेरवानी यांनी पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली.

या प्रसंगी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, चैतन्यबापू देशमुख, माजी मंत्री डी. पी. सावंत, महापौर कविता मुळे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांना वरील सर्व सन्माननीय व्यक्तींच्या हस्ते नियुक्ती प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना भाजप व्यापारी आघाडीचे महानगराध्यक्ष प्रेमकुमार फेरवानी यांनी शुभेच्छा दिल्या.

नवीन कार्यकारिणीत सुधाकर टाक – भाजपा व्यापारी आघाडी दक्षिण विधानसभा प्रमुख, रवी कडगे –भाजपा व्यापारी आघाडी उत्तर विधानसभा प्रमुख, उपाध्यक्ष – राजेश भराडीया, सुरजीतसिंघ खालसा, जगन्नाथ बिंगेवार, हरेश ठक्कर, अशोक खियानी, सरचिटणीस विनोद दरक, कोषाध्यक्ष हरिष लालवाणी, मीडिया प्रमुख किरण मामीडवार. सरचिटणीस – सुरेश निलावार, कीर्ती छेडा, राहुल चक्रवार, साईनाथ रिसनगावकर, हरमोहिंदरसिंघ खालसा, चिटणीस – इंदर दायमा, किरण जवादवार, मितेश शहा, सुरेश मिटकरी, विशाल कुंदकुर्ते, बरजंग दरक, दत्तात्रय बंडेवार, दिनेश बोरा, पंकज कोठारी, अमित तळणकर, विजय सारडा, जीवन टाक, तेजसकुमार हळदे यांची निवड करण्यात आली आहे.

महावितरणच्या ४१ गुणवंत कर्मचाऱ्यांचा सन्मान

नांदेड (प्रतिनिधी) – महावितरणच्या नांदेड परिमंडल कार्यालयात ४१ गुणवंत कामगारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी १० दिव्यांग वीज कर्मचाऱ्यांना स्कूटरचे वितरण करुन महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन साजरा करण्यात आला.

प्रारंभी मुख्य अभियंता राजाराम माने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास सहायक महा-व्यवस्थापक प्रदीप सातपुते, प्रभारी अधीक्षक अभियंता विनय घनबहादूर, प्रभारी कार्यकारी अभियंता पांडुरंग बोडके, व्यवस्थापक मिलिंद कांबळे, प्रभारी उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी एम. एस. सदावर्ते उपस्थित होते. महावितरणच्या तरतुदीनुसार रामेश्वर रोडे, गणपत मोरे, विश्वनाथ दाभाडे, वैशाली कांबळे, रामेश्वर शिंदे, रघुनाथ गोरडवार, सिराज शेख, बसवराज जिरगे, गोविंद हाळदेकर, गंगारेड्डी भूपतवार यांना स्वयंचलित स्कूटरचे वितरण मुख्य अभियंता राजाराम माने यांच्या हस्ते करण्यात आले.

या वर्षीचा गुणवंत कर्मचारी सन्मान यंत्रचालक आणि तारमार्ग कर्मचारी-लाईनस्टाफ प्रवर्गात विक्रमकुमार सिंगणवाड, नामदेव कल्याणकर, प्रमोद देशमुख, रईस खान, श्रीहरी पाध्ये, गणपत मोरे, अनंत चेवले, रमेश गिरी, भारत किंगरे, अब्दुल सुलेमान, धनंजय घोडके, बापू कदम, भाग्यश्री हजारे, प्रभाकर राखुंडे, नागदेव करवर, मुंजाजी सुरवसे, भानुदास जिंदे तर जनमित्रामध्ये प्रकाश मारकड, सचिन अटकळीकर, अब्दुल खय्युम, नागोराव मेंडके, भागवत जाधव, विजय कोतूरवार, किरण निर्मले, संभाजी सिरसे, संतोष वाघमारे, अनंत भालेराव, सिध्दार्थ जोंधळे, शिवशंकर कपटे, माधव हराळे, गोकूळ पवार, माधव शिंदे, पवनकुमार कनाके, उध्दवचरण ढगे, संकेत गीमेकर, यादूल शेख, शंकर बासोड, हनमंत मनधरणे, राजेश्वर दुसेवार, नितीन देवमारे यांना उत्कृष्ट गुणवंत कामगार सन्मानार्थ सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन सन्मानीत करण्यात आले.

आपले सरकार पोर्टलसंबंधी प्रशिक्षणाचे आज आयोजन

नांदेड (प्रतिनिधी) –जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागासाठी आपले सरकार पोर्टलबाबतचे प्रशिक्षण मंगळवार, दि. ५ मे २०२६ रोजी कै. डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन प्रेक्षागृह जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे आयोजित करण्यात आले आहे. सर्व संबंधितांनी या प्रशिक्षणास उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

हे प्रशिक्षण नांदेड, लोहा, कंधार, अर्धापूर, मुदखेड, भोकर, हदगाव, नायगाव तालुक्यासाठी सकाळी १० वा. तर देगलूर, बिलोली, मुखेड, धर्माबाद, उमरी, हिमायतनगर, किनवट, माहूर तालुक्यासाठी दुपारी १ वा. होणार आहे. ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय २८ जानेवारी २०२५ नुसार महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत अधिसूचित केलेल्या आपले सरकार पोर्टलवरुन नागरिकांना सेवा पुरविण्यासाठी युजर आयडी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

जुन्या वादातून एकावर प्राणघातक हल्ला; ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नांदेड (प्रतिनिधी) –शहराच्या इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या सिद्धार्थनगर भागात जुन्या वादातून एकावर आठ जणांनी संगनमत करून प्राणघातक हल्ला केला. यात सौरभ कांबळे (वय २६) हा गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर नांदेडच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना दोन मे रोजी रात्री साडेसात ते आठच्या सुमारास घडली.

जुन्या नांदेड भागातील सिद्धार्थनगर नावघाट परिसरात राहणारा सौरभ एकनाथ कांबळे (वय २६) याच्यासोबत त्याच भागातील रिहान इद्रिस (वय १८) याचे काही दिवसांपूर्वी भांडण झाले होते. या भांडणाचा राग मनात धरून रिहान इद्रीस याने इद्रिस (वय ४७), सलाम (वय ३७), जहीर (वय २९) आणि इतर चारजण यांनी संगनमत करून सौरभ कांबळे याला रस्त्यात आडवून शिवीगाळ करत सुरुवातीला थापडबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याच्या पायावर, डोक्यावर, हातावर घातक शस्त्राने गंभीर दुखापत करून जखमी केले. त्यानंतर इतर नागरिकांनी धावाधाव केल्याने या आरोपीतांनी घटनास्थळावरून पळ काढला. जखमी सौरभ कांबळे याच्यावर नांदेडच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून, त्याच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध प्राणघातक हल्ला, भारतीय हत्यार कायद्यांसह अँट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीमती वच्छलाबाई जोंधळे यांचे निधन

नांदेड (प्रतिनिधी)– येथील विष्णू नगरातील रहिवासी वच्छलाबाई गंगाधर जोंधळे यांचे रविवार, दि. ३ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९५ वर्षे होते. त्यांच्या पार्थिवावर रविवारी सायंकाळी नांदेड येथील गोवर्धनघाटावरील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या धार्मिक वृत्तीच्या आणि मनमिळावू होत्या. त्यांच्या पश्चात १ मुलगी, जावई, नातू असा परिवार आहे.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com